दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ४ थे अंक १२ वा शनिवार दि.०८ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## विधानसभा निवडणुकांत जनता मिर्च्यांचा धूर देईल; रोहित पवार

अंमलबजावणी संचालयानं (ईडी) अजित पवार गटाचे नेते प्रफुल पटेल यांची संपत्ती जप्त करण्याची कारवाई रद्द केली. यामुळे प्रफुल्ल पटेल यांना मोठा दिलासा मिळाला. यावरून आमदार रोहित पवार यांनी आगामी विधानसभा निवडणुकांत जनता मिर्च्यांचा धूर देईल असे म्हणत सत्ताधारी सरकारला लक्ष्य केले आहे. या संदर्भातील पोस्ट आमदार रोहित पवार यांनी केली आहे.



'जनता नाकी नऊ आणल्याशिवाय राहणार नाही' आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे की, सत्तास्थापनेच्या तडजोडीत जनमताने दिलेला ठसका विसरून ज्यांना जनतेनेही नाकारलं. अशांना क्लीनचीट दिली जात आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये हीच जनता 'मिर्च्यां'चा धूर देऊन, भाजपच्या नाकी नऊ आणल्याशिवाय राहणार नाही, हे मात्र निश्चित, अशी देखील टीका केली आहे. 'भाजपने दोषींना वॉशिंग मशीनमध्ये स्वच्छ करून घेतले' लोकसभा निवडणुकांत ईडीच्या माध्यमातून केलेल्या राजकारणाचा भाजपला सर्वाधिक फटका बसला. दोषींवर कारवाई केलीच पाहिजे, परंतु भाजपने दोषींना वॉशिंग मशीनमध्ये स्वच्छ करून घेतले, हे सर्वसामान्य जनतेला आणि भाजपच्या निष्ठावान कार्यकर्त्यांनाही पटलं नाही.

# विधानसभेचे तिकीट नाकारलेले विनोद तावडे राष्ट्रीय स्तरावर महत्वाच्या भूमिकेत...

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदींची उमेदवारी असलेली पहिली यादी जाहीर करणे, भाजपच्या जाहीरनामा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, एनडीएला मिळालेल्या तिसऱ्या मोठ्या विजयानंतर भाजप मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, भाजपच्या राष्ट्रीय स्तरावरील सगळ्या महत्त्वाच्या बैठका, एनडीएच्या घटक पक्षांमध्ये समन्वयक या सर्वांमध्ये एक 'मराठी' नाव कायम आढळून आले, ते म्हणजे विनोद तावडे. विनोद तावडे यांचे राजकीय अस्तित्व संपेल की काय? २०१९ च्या विधानसभा निवडणुकीवेळी उमेदवारी नाकारली गेली. राज्याच्या राजकारणातून काहीसे बाहेर फेकले गेले. त्यानंतर जबरदस्त कमबॅक करत दिल्लीच्या राजकारणात जम बसवला. बिहारचे प्रभारी म्हणून जबाबदारी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ज्या विनोद तावडेंचे राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या वेळी उमेदवारी नाकारली गेली. त्यानंतर विनोद तावडे राज्याच्या राजकारणातून काहीसे बाहेर फेकले गेले. पुढे विनोद तावडे यांचे राजकीय अस्तित्व संपेल की काय?, अशा शक्यता अनेकांना दिसू लागली. मात्र, विनोद तावडे यांनी जबरदस्त कमबॅक केले. भारतीय जनता पक्षाने पक्ष संघटनेत राष्ट्रीय सरचिटणीसपदी त्यांची नियुक्ती केली. देशातील बिहारसारख्या संवेदनशील, पक्षाला प्रतिकूल आणि महत्वाचे राज्य असलेल्या बिहारचे प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली. या सर्व जबाबदाऱ्या दिल्यानंतर त्यांनी दिल्लीच्या राजकारणात चांगलाच जम बसवला. आणि ते पक्षनेतृत्वाच्याही जवळ पोहोचले. भाजपच्या सर्व महत्त्वाच्या बैठकांमध्ये तावडे यांचा सहभाग भाजपच्या सर्व महत्त्वाच्या बैठकांमध्ये तावडे यांची ऊठबस दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विविध कार्यक्रमांचे सूक्ष्म नियोजन, महत्त्वाच्या गोष्टींसह विविध महत्त्वाच्या सभांचा आढावा याची जबाबदारीही त्यांच्याकडे आहे. लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी भाजपमध्ये झालेले अनेक पक्षप्रवेश हे त्यांच्या उपस्थितीत झाले. त्यांना २०१९ मध्ये विधानसभेची उमेदवारी नाकारली गेली होती, आता त्यांनीच पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अन्य नाव असलेली भाजपची पहिली लोकसभेची यादी जाहीर केली.



सर्व घटक पक्षांमध्ये समन्वय साधण्यासाठी समन्वयक म्हणून निवड

पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या ज्या महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी पक्ष मुख्यालयात आले. त्या सर्व कार्यक्रमांचे सूत्रधार हे विनोद तावडेच आहेत. लोकसभा निवडणुकीदरम्यान त्यांनी देशाच्या बहुतांश भागात दौरे केले. देशात तिसऱ्यांदा एनडीए सरकार येत आहे. आता एनडीएमध्ये असलेल्या सर्व घटक पक्षांमध्ये समन्वय साधण्यासाठी समन्वयक म्हणूनही त्यांचीच निवड करण्यात आली आहे. तावडे आजघडीला आमदार किंवा खासदार नाहीत. आमदारकी, खासदारकी मिळवण्यासाठी तावडेंनी कधी फिल्डिंगही लावली नाही. मात्र, ते आता आणखी नव्या भूमिकेत दिसू शकतात. लोकसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर सरकार स्थापन करत असलेल्या भाजपमध्ये वातावरण चांगलेच तापले आहे. देशासह राज्यातही भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. महाराष्ट्रत तर भाजपला केवळ ९ जागा मिळाल्या. यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी 'मला सरकारमधील जबाबदारीतून मोकळे करा,' अशी विनंती पक्ष नेतृत्वाकडे केली आहे. फडणवीस पक्षाच्या संघटनेत आणि विधानसभेच्या तयारीत लक्ष घालू इच्छित आहेत. अर्थात, यावर अंतिम निर्णय भाजपमधील शीर्ष नेतृत्व घेणार आहे. एनडीएच्या सरकार –३ स्थापनेनंतर महत्वाची जबाबदारी मिळणार मात्र, या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये काही ठिकाणी मोठे बदल होण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्रात यापूर्वी एनडीएतील महत्वाच्या घटकपक्षांना सोबत घ्यायचे असेल. किंवा लोकसभा निवडणुकीत अडचणीची ठरलेली समीकरणे दुरुस्त करायची असल्यास तावडे यांच्याकडे राज्याचा दृष्टीने महत्वाची जबाबदारी दिली जाऊ शकते. त्यावर सध्या भाजपमध्ये मंथन सुरू असल्याचे समजते. मात्र, फडणवीस यांच्या 'मला सरकरमधून मोकळे करा' या वक्तव्यानंतर तावडे यांची चर्चा भाजपमध्ये राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरही होत आहे.


# थापांचा बाप कोण? चित्रा वाघ यांचा सुप्रिया सुळेंवर निशाणा

लवकरच संसदेत पाऊल ठेवाल तेव्हा या महापुरूषांसमोर नतमस्तक होऊन खोटं बोलल्याचं प्रायश्चित्त घ्याल, अशी अपेक्षा आहे, असे म्हणत भाजपच्या राज्य महिला अध्यक्षा चित्रा वाघ यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर निशाणा साधला आहे.चित्रा वाघ यांनी आपल्या पोस्टवर म्हटलं आहे, ओ मोठ्ठया ताई, संसद भवन परिसरातून राष्ट्रपुरुषांचे फोटो हटवले यावरुन सुप्रिया सुळे यांनी आपल्या 'द' खात्यावर पोस्ट केली होती. याला प्रत्त्युत्तर चित्रा वाघ यांनी दिले आहे. त्यांनी म्हटलं आहे की, आपले महापुरूष तुमच्यासाठी केवळ प्रचारात मिरवण्याची गोष्ट असेल. आमच्यासाठी ते प्रातःस्मरणीय आहेत. त्यामुळे संसदेच्या प्रांगणातले पुतळे हटवले जात असल्याचं असत्य पसरवून उगाच 'ध'चा 'मा' करणाऱ्या आधुनिक आनंदीबाई बनू नका. हे पुतळे नवीन जागी हलवले जाताहेत, हटवले जात नाहीयेत. आत्मनिर्भर भारताच्या स्वाभिमानाची खूण म्हणजे नवीन संसद भवन. ज्यावर तुम्हीच बहिष्कार घातला होता. कारण तुम्हाला इंग्रजांनी उभारलेले जुने संसद भवन प्रिय होते. आता मात्र तुम्हाला जळजळतंय. आता सहन न झाल्यानेच खोट्या बोंबा मारणं, थापा मारणं सुरू केले आहे. या थापांचा बाप कोण हे जनतेला चांगलेच ठाऊक आहे? भारतीय जनता पक्षाचा विचार आणि संस्कार आत भिनलेले असतात आणि विरोधकांचे विचार हे प्रचार आणि फार फार तर वचननाम्यापुरतेच झळकतात. म्हणूनच तर स्टंटबाजीत तुमच्याकडून श्रद्धेय बाबासाहेबांचा फोटो फाडला जातो. शिवरायांचा खोटा इतिहास नव्याने लिहिण्यात काँग्रेसचा हात तर कोणीच धरू शकत नाही. लवकरच संसदेत पाऊल ठेवाल, तेव्हा या महापुरूषांसमोर नतमस्तक होऊन खोटे बोलल्याचे प्रायश्चित्त घ्याल, अशी अपेक्षा आहे. सुप्रिया सुळे काय म्हणाल्या होत्या ? खासदार सुप्रिया सुळे यांनी आपल्या 'द' खात्यावर पोस्ट करत म्हटले आहे, संसद भवन परिसरातून छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे भव्य पुतळे हटविण्यात आले.

## जळगावच्या तिघांचा रशियात बुडून मृत्यू

जळगाव : रशियातील यारोस्लाव–द–वाईज नोव्हगोरोड स्टेट युनिव्हर्सिटीजमध्ये वैद्यकीय शाखेत शिकत असलेले जळगाव जिल्ह्यातील तीन विद्यार्थी वोल्खोव्ह नदीच्या किनारी शहराच्या समुद्रकिना–याजवळ फेरफटका मारत होते. त्यावेळी लाट येऊन त्यांचा त्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या तिघांसोबत असलेल्या विद्यार्थ्यास वाचवण्यात यश आले आहे.

याबाबत जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी रशिया येथील दुतावासातील कुमार गौरव (आय.एफ.एस) यांच्याशी संपर्क करून सर्व माहिती जाणून घेतली. तसेच निवासी जिल्हाधिकारी सोपान कासार यांनी पालकांना तिथल्या प्रशासनाशी संपर्क करून दिला आहे. याबाबत प्राथमिक माहितीनुसार, हर्षल अनंतराव देसले (भडगाव), जिशान अश्पाक पिंजारी, जिया फिरोज पिंजारी (अमळनेर) हे विद्यार्थीरशियाच्यायारोस्लाव–द–वाईज नोव्हगोरोड स्टेट युनिव्हर्सिटीजमध्ये वैद्यकीय



शिक्षण घेत होते. हे तिघे आणि त्यांचे सहविद्यार्थी त्यांच्या अभ्यासाच्या मोकळ्या वेळेत संध्याकाळी वोल्खोव्ह नदीच्या किनारी शहराच्या समुद्रकिना–याजवळ फेरफटका मारत होते. यावेळी एक मोठी लाट आली आणि त्यांना नदीत ओढले. यात तिघांचा मृत्यू झाला. तर एकाला वाचविण्यात यश आले आहे. त्यावेळी ही दुर्दैवी घटना घडली.

## मानहानी प्रकरणात राहुल गांधींना जामीन

बंगळूरू : काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांना मानहानीच्या केसमध्ये बंगळूरुच्या स्पेशल कोर्टाने जामीन मंजूर केला आहे. हे प्रकरण मागच्या विधानसभा निवडणुकांमधले आहे. तेव्हा राहुल गांधींनी तत्कालीन मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्यावर गैरव्यवहाराचा आरोप केला होता. त्यानंतर राहुल गांधींवर त्यांनी खटला दाखल केला होता.

या प्रकरणी भाजपचे वकील विनोद यांनी म्हटले की, २०२३च्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने एक जाहिरात प्रकाशित केली होती. ज्यात भाजप ट्रबलमेकर सरकार आहे असे म्हटले होते. हा खोटा आरोप होता. आरोपींपैकी दोघांना जामीन मिळाला आहे. याप्रकरणी राहुल गांधींनी स्वत: हजर होण्यापासून मुभा मागितली होती. या प्रकरणी काँग्रेस नेते आणि उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांच्यासह मुख्यमंत्री सिद्धरामय्या हेसुद्धा आरोपी आहेत. परंतु कोर्टाने दोघांनीही जामीन दिलेला आहे. कर्नाटक भाजपने काँग्रेसवर आरोप करत वर्तमानपत्रांमधून खोटो आरोप केल्याचा आरोप केला होता. शिवाय राहुल गांधींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर ती जाहिरात शेअर केली होती.

## मुंबई येथील टिळक भवन येथे आज डॉ.शिवाजी काळगे यांच्यासह राज्यातील

नवनिर्वाचित काँग्रेस पक्षाचे नेते पदाधिकारी रमेश कार्यकर्ते यांनी सक्रिय राहण्याचा आणि

पक्षाच्या सर्वच खासदारांचा,प्रदेशप्रभारी चेन्नीथला,प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले,माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे,पृथ्वीराज चव्हाण,विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व इतर मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.



नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या बाजूने कौल दिला आहे, त्यामुळे जनतेच्या अपेक्षा पूर्ण करून त्यांचा विश्वास कायम सर्व नवनिर्वाचित खासदार आणि राज्यातील आगामी निवडणुकीतही सर्वांनी एकजूट दाखवून चांगले यश संपादन करण्याचा निर्धार यावेळी झालेल्या बैठकीत करण्यात आला आहे.

## राम कृष्ण हरी वाजली तुतारी

पुणे : एका बैठकीत चंद्रकांत पाटील म्हणाले होते की, शरद पवार यांना बारामतीमधून संपविणार. बारामतीमधून शरद पवार आणि त्यांचे राजकारण भाजपला संपवायचे आहे. त्यांचा पराभव बस यही काफी है असा वक्तव्य त्यांनी केले होते. या वक्तव्याचे त्यावेळी तीव्र पडसाद उमटले होते. अजित पवारांनी सुद्धा याबाबत नाराजी व्यक्त केली होती. याबाबत माध्यमांनी सुप्रिया सुळेंना प्रश्न विचारला असता त्यांनी हात जोडून प्रतिक्रिया दिली आहे. राम कृष्ण हरी वाजली तुतारी अशा शब्दात त्यांनी पाटलांना उत्तर दिले आहे.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीने मुसंडी मारत यंदाच्या लोकसभेत समाधानकारक जागा मिळवल्या आहेत. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला १० पैकी ८ जागा मिळाल्या आहेत. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला एकच जागा मिळाली आहे. शरद पवारांनी पक्षाचे नवीन चिन्ह, नवीन नाव या जोरावर ८ जागा मिळवून दाखवल्या. पण अजित पवारांना हे जमले नसल्याचे निकालावरून दिसून आले. या निवडणुकीत देशभर चर्चा झालेल्या नणंद भावजयच्या लढतीत सुप्रिया सुळेंनी बाजी मारली आहे.

लाखांच्या लीडने सुप्रिया जिंकून आल्याने महाराष्ट्रात त्यांचे कौतुक केले जात आहे. या विजयी जल्लोषात सुप्रिया सुळेंनी माध्यमांशी बोलताना चंद्रकांत पाटलांच्या एका वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. खासदार सुप्रिया सुळे निवडून आल्यानंतर पुण्यात प्रथमच मार्केटयार्डात येथे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी राज्यभिषेक दिन निमित्ताने खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रथम मार्केटयार्ड छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यावेळी त्या बोलत होत्या. महायुतीने सुरुवातीच्या काळात चंद्रकांत पाटील यांनी बारामती लोकसभा मतदारसंघात बैठका घेतल्या होत्या.

## पुढच्या १० वर्षात विकासाचा नवा अध्याय रचणार : पंतप्रधान नरेंद्र मोदी

नवी दिल्ली ; एनडीए हा भारताचा आत्मा आहे. सुशासन आणि एनडीए हे समानार्थी शब्द आहेत. सरकार चालवण्यासाठी बहुमताची गरज असते. सरकार चालवण्यासाठी सर्वांची सहमती गरजेची आहे. निवडणुकीत कार्यकर्त्यांनी अथक प्रयत्न केले आहेत. एनडीए देशाला प्रगतीच्या मार्गावर नेणार असून, पुढच्या १० वर्षात विकासाचा नवा अध्याय रचणार असल्याचा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला. नवनिर्वाचित खासदार आणि एनडीए पक्षातील नेत्यांची बैठक आज जुन्या संसद भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये आयोजित केली होती. या ठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एनडीए नेतेपदी निवड होत असल्याची घोषणा आज (दि.७ जून) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी नड्डा यांनी केली. यावेळी आपल्या भाषणात ते बोलत होते.



एनडीएची युती ही सर्वात यशस्वी युती यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी यांनी हा क्षण माझ्यासाठी भावूक असल्याचे सांगितले. जनतेने माझ्यावर विश्वास दाखवला. एनडीएवर विश्वास दाखवला आहे. गरिबांचं कल्याण आमच्यासाठी केंद्रस्थानी आहे. २२ राज्यातील लोकांनी ला सेवा करण्याची संधी दिली आहे. एनडीएला ३ दशक पूर्ण होणे हा मजबुतीचा संदेश आहे. देश आणि माझ्यात विश्वासाचं नातं आहे. राष्ट्र प्रथम ही आमची मुळ भावना आहे. जनता आणि शासन यांच्यामध्ये एक दरी निर्माण झाली होती. ती आम्ही मिटवण्याचा प्रयत्न केला.

देशाला सध्याच्या स्थितीत फक्त वर विश्वास पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांवर जोरदार हल्ला केला.भारताच्यालोकशाहीचा विरोधकांनी अपमान केला. निकालाआधीपासून विरोधकांनी हिंसेची भाषा केली. योजनापूर्ण देशाला हिंसेच्या आगीत झोकण्याच काम केलं गेलं. मात्र ने विरोधकांना शांत केलं. ईव्हीएम जिवंत आहे की मेलं? असा प्रश्न मोदींनी विरोधकांना केला. १० वर्षानंतरही काँग्रेस १०० जिकली नाही. ४ जून नंतर तर विरोधकांची वागणूक विचित्र झाली आहे. मात्र देशाला सध्याच्या स्थितीत फक्त वर विश्वास असल्याच त्यांनी सांगितलं.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# जनादेश-पक्षादेश!

‘तुमच्याकडे देशाचे नेतृत्व देणार नाही, पण तुम्ही तुल्यबळ विरोधी पक्षाची जागा भरून काढा’ हा जनादेश स्वीकारण्याची शहाणीव इंडिया आघाडीने दाखवली. दोन परस्परविरोधी राजकीय विचारधारेतील पक्ष आणि व्यक्ती यांच्याकडून एकाच दिवशी, एकाच वेळी दोन शहाणे निर्णय घेतले जाण्याचा अनुभव भारतीयांसाठी तसा दुर्मीळ. तो बुधवार, ५ जून या एकाच दिवसात आला. यातील पहिला शहाणा निर्णय राजधानी दिल्लीत घेतला गेला तर दुसरा देशाच्या आर्थिक राजधानी मुंबईत. यातील पहिल्या निर्णयाचे महत्त्व अधिक कारण त्यात एकापेक्षा अधिक व्यक्ती होत्या आणि अनेक राजकीय पक्ष त्यात सहभागी होते. हा निर्णय ‘इंडिया’ आघाडीचा होता आणि दुसरा भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्रातील नेते देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. त्यासाठी ‘इंडिया’ आघाडी आणि देवेंद्र फडणवीस हे दोघेही अभिनंदनास पात्र ठरतात. या दोन्ही निर्णयांचे परिणाम तात्कालिक आणि दूरगामी असे दोनही पातळ्यांवर होणार असल्याने त्यावर भाष्य आवश्यक ठरते. प्रथम ‘इंडिया’ आघाडीविषयी. या आघाडीने सत्ता स्थापनेसाठी दावा न करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत योग्य, स्तुत्य आणि खऱ्या अर्थाने लोकशाहीवादी ठरतो. या निवडणुकीतील जनादेशाचा खरा अर्थ समजून घेण्याचे शहाणपण या आघाडीतील ज्येष्ठांनी दाखवले ही खरोखरच कौतुकाची बाब. निवडणूकपूर्वकालीन उन्माद आणि केंद्रीय सत्ताधाऱ्यांतील ज्येष्ठांनी प्रचारात गाठलेली हीन पातळी लक्षात घेता संतापापोटी या आघाडीने सत्तास्थापनेसाठी दावा करणे एक वेळ राजकीयदृष्ट्या समर्थनीय ठरलेही असते. पण तसे केले असते तर त्यातून मुत्सद्दीपणाचा अभाव दिसून आला असता. तो धोका या आघाडीतील सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, शरद पवार, सीताराम येचुरी आदींनी टाळला. म्हणून त्यांचे अभिनंदन. याचे कारण असे की या निवडणुकीचा जनादेश नरेंद्र मोदी यांच्याविरोधात असला तरी ‘इंडिया’ आघाडीच्या बाजूने निश्चित नाही. उन्मादी, स्वत:स परमेश्वराचा अवतार मानण्यापर्यंत विवेकाच्या पातळीवर घसरलेल्या सत्ताधीशांस भानावर आणणे हे या निवडणुकीचे उद्दिष्ट होते आणि तोच ‘इंडिया’ आघाडीच्या अस्तित्वाचा अर्थ होता. तो समजावून देण्याचे काम या आघाडीने चोख बजावले. खरे तर नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप हा अन्य कोणत्याही राजकीय पक्षांइतकाच गुणदोषांनी भरलेला पक्ष. पण त्या पक्षाचे नेतृत्व स्वत:स अपौरुषेय मानू लागले होते. अशा वेळी तो पक्ष आणि विशेषत: पक्षनेतृत्व यांचेही पाय अन्य मर्त्य मानवांप्रमाणेच मातीचे आहेत हे दाखवून देण्याची नितांत गरज होती. ती ‘इंडिया’ आघाडीने उत्तमपणे पार पाडली. तथापि ही जबाबदारी पार पाडणे म्हणजे विजय नव्हे. या आघाडीस निर्विवाद बहुमत मिळाले असते तर अर्थातच त्यास विजय मानावेच लागले असते. तसे झालेले नाही. त्यामुळे लागलेल्या निकालाचा रास्त अर्थ या आघाडीने लक्षात घेणे आवश्यक होते. तो घेण्याइतका प्रामाणिकपणा या आघाडीने दाखवला. या निकालाचा अर्थ देशास सक्षम, तुल्यबळ विरोधी पक्षाची गरज दाखवून देतो. ती गरज ही आघाडी पूर्णपणे भागवते. पण ती सत्ता राबवण्याइतकी ‘वयात’ आलेली नाही, हा अर्थही या जनमतातून दिसतो. तरुण–तरुणीने विवाह करण्यासाठी कायदेशीर वयाचा टप्पा गाठला याचा अर्थ त्यांनी लगेच बोहल्यावर चढावे असा खचितच नसतो. तद्वत ‘इंडिया’ आघाडीने या निवडणुकीत सत्तास्वयंवरास आवश्यक वयाचा टप्पा गाठला. पण विवाहोत्तर दीर्घकालीन स्थैर्यासाठी ज्याप्रमाणे उभयतांत शारीरिक क्षमतेपलीकडे आर्थिक/ सामाजिक आदी आघाड्यांवर सौहार्द निर्माण व्हावे लागते त्याप्रमाणे ‘इंडिया’ आघाडीस या गुणांची जोपासना आधी आपल्यात करावी लागेल. याअभावी सत्तास्थापनेचे दु:साहस घडले असते तर राजकीयदृष्ट्या अनुदार, असहिष्णू आणि आक्रमक भाजपने हे सरकार पाडण्यासाठी जंगजंग पछाडले असते आणि त्यात यशस्वी ठरल्यानंतर पुढची ५० वर्षे एकपक्षीय, एकांगी आणि एककल्ली राजवटीचा वरवंटा देशावर फिरवला असता. तो धोका ‘इंडिया’ आघाडीच्या निर्णयाने टळला. हाच या जनादेशाचा अर्थ होता आणि तो तसाच या आघाडीने घेतला. म्हणून ही बाब कौतुकास्पद.दुसरा मुद्दा पक्षीय आदेशाचा. तो देवेंद्र फडणवीस यांना हवा असून त्याची जाहीर वाच्यता करण्याचे धैर्य त्यांनी अखेर एकवटले म्हणून त्यांचेही अभिनंदन. वास्तविक अडीच वर्षांपूर्वी भाजप नेतृत्वाने यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी दिली तेव्हाही फडणवीस यांनी सरकारात सहभागी न होण्याची इच्छा जाहीरपणे व्यक्त केली होती. भाजपच्या हवेत उडत असलेल्या केंद्रीय नेतृत्वाने त्याची दखल न घेता त्यांचा जाहीर अपमान करत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली फडणवीस यांस उपमुख्यमंत्रीपद स्वीकारायला लावले. ‘पाडले कोणास? पडले कोण?’ या संपादकीयातून (१ जुलै २०२२) ‘लोकसत्ता’ने त्यावर त्या वेळी टिप्पणी केली होती. पक्षनेतृत्वाने केलेला जाहीर अपमान फडणवीस यांनी मुकाट्याने गिळला आणि ते सरकारात सामील झाले. यांचे सरकार पाडावे ही फडणवीस यांची इच्छा होतीच. त्यासाठी आवश्यक ते उद्योग आणि उचापती त्यांनी केल्याच. पण नंतर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतही अशी फोडाफोड करावी यात त्यांच्यापेक्षा भाजपच्या केंद्रीय नेतृत्वास अधिक स्वारस्य होते. आपल्या अचाट ताकदीने आपण कोणालाही पाडू शकतो, कोणालाही फोडू शकतो असा दंभ निर्माण झालेल्या भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने ही फूट स्थानिक भाजप नेतृत्वावर लादली आणि दोघांच्या सरकारांत आणखी एकास सामावून घेण्याची वेळ फडणवीस यांच्यावर आली. या राजकीय उलथापालथीत फडणवीस यांस साळसूदपणाचे प्रमाणपत्र देण्याची अजिबात गरज नाही, हे खरे. परंतु म्हणून न केलेले पापही त्यांच्या माथी मारण्याची गरज नाही, हेही तितकेच खरे. शिंदे यांना फोडण्यातून २०१९ साली साथ सोडणाऱ्या शिवसेनेस कथित ‘धडा शिकवणे’ ही भाजपची गरज होती हे वादासाठी मान्य केले तर पवार यांच्या घरात घडवून आणलेली फूट ही केवळ मदमस्त भाजपची चूष होती हेही मान्य करावे लागेल. फडणवीस यांनी ते केले होते आणि विधानसभेचा उर्वरित काळही त्यांनी हे गोड मानत असाच व्यतीत केला असता. तथापि ताज्या लोकसभा निवडणूक निकालांनी घात केला आणि भाजपस जमिनीवर यायला लावले. या निकालाचा अर्थ सुस्पष्ट आहे. राज्यातील सत्ताधारी तिरपागडा ‘तीन तिघाडा’ मतदारांस अजिबात मंजूर नाही. विधानसभा निवडणुकांस तो तसाच सामोरा गेला तर हा गाडा मोडून पडणार हे जाणण्याइतके चातुर्य फडणवीस यांच्या ठायी आहे. शिवाय; एके काळच्या नेतृत्वाप्रमाणेच आपल्या दिल्लीतील शीर्षस्थ नेत्यांचे वर्तन असते, हेही फडणवीस जाणतात. यशाचे श्रेय स्वत:स मिळेल याची खातरजमा करायची आणि पराजयासाठी राज्यस्तरीय नेत्यांस बळी द्यायचे हेच विद्यमान भाजप नेतृत्व करते. आता महाराष्ट्रात भाजपस मोठी बाजी मारता आली असती तर ती ‘मोदी की गॅरंटी’ म्हणत दिल्लीस्थित कथित चाणक्यांनी ते यश मिरवले असते. शहाण्या महाराष्ट्राने ते होऊ दिले नाही. तेव्हा हे अपयशाचे पाप फडणवीस यांच्या पदरात पडणे ओघाने आलेच.

# विश्वकर्मीय सुतार समाजातील नेत्यांनी ओबीसी संदर्भात कर्तबगारी दाखवावी अन्यथा समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल!

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणाऱ्या सर्वच स्वयंघोषित नेत्यांनी ओबीसी संदर्भात कर्तबगारी दाखवावी अन्यथा विश्वकर्मीय सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल.समाजात नेतेगिरी करणाऱ्या नेत्यांकडे ओबीसी संदर्भात जर दूरदृष्टी,निश्चित दिशा आणि ठोस कृती कार्यक्रम नसेल,समाज प्रबोधनात्मक शिवधनुष्य पेलता येत नसेल तर नैतिक मूल्यांचे,नैतिक धर्माचे पालन करावे आणि स्वतःला समाज नेतृत्व म्हणवून घेऊ नये.विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाचे नेतृत्व म्हणून जर नैतिक जबाबदारी समजत नसेल तर स्वतःच्या नावासाठी आणि मोठेपणासाठी उतावीळपणा करून संपूर्ण विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची दिशाभूल करु नये.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात ओबीसींसाठी तरतूद केलेली असून विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाज हा संवैधानिक आधारावर ओबीसी प्रवर्गातीलच एक मोठा ओबीसी घटक आहे समाजात नेतेगिरी करणाऱ्या सर्वच स्वयंघोषित नेत्यांना याचा विसर पडू नये.

विश्वकर्मीय सुतार समाज मुळातच बहुजन समूहातीलच ओबीसी घटक आहे याबाबत समाजात समाज जागृती अजिबात नाही त्यामुळे समाज अनभिज्ञ आहे.मी एक विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बांधव असून माझ्याकडे माझ्या जातीचा दाखला असून ओबीसी सुतार अशी सरकार दप्तरी नोंद आहे.ओबीसी,संविधान,जनगणना,आरक्षण,सत्ता,संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी प्राप्त करण्यासाठी विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात समाज नेतेगिरी करणाऱ्या,स्वतःलाच संपूर्ण ओबीसी सुतार समाजाचे नेतृत्व समजणाऱ्या सर्वच स्वयंघोषित समाज नेत्यांनी राज्यातील कानाकोपऱ्यात खेडोपाडी गावागावात,वाडीवस्तीमध्ये प्रत्येक नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने समाज बांधवांना एकत्रित करून ओबीसी,संविधान,जनगणना, आरक्षण,सत्ता,संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करणे गरजेचे आहे.विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाला दिशाहीन आणि फक्त नेतेगिरी करण्यासाठीच उतावीळ झालेले समाज नेते लाभले तर मात्र विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल.

ओबीसी,आरक्षण संदर्भात राज्यातील अनेक ओबीसी संघटना आणि ओबीसी संघटनांचे नेते,कार्यकर्ते,पदाधिकारी विविध पातळीवर आपापल्या परीने ओबीसींच्या हक्काच्या लढाईत उतरलेले असतांना मात्र ओबीसी सुतार समाजातील स्वतःला समाजाचे नेतृत्व म्हणवून घेणारे तथाकथित समाज नेते ओबीसींच्या लढाईत कुठेही उतरतांना दिसत नाहीत.समाजातील कोणत्याही स्वयंघोषित नेत्यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करून राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात स्पेशल ओबीसी,जनगणना,आरक्षण, सत्ता,संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी संदर्भात समाज जागृती मेळाव्याचे आयोजन केल्याचे पुराव्यानिशी कोणालाही सिद्ध करता येणार नाही.हिच सत्य परिस्थिती समाजात असतांना मग या स्वयंघोषित नेत्यांना विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात समाज नेते म्हणवून घेण्याचा नैतिक अधिकार आहे काय याचा सुद्धा समाजाने विचार करण्याची नितांत गरज आहे यासाठी समाजाने सुद्धा जागरूक असणे गरजेचे आहे.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडल्यास समाजातील ओबीसी,संविधान,जनगणना,आरक्षण,सत्ता संपत्ती ज्ञान,राजकीय हिस्सेदारी इत्यादी महत्वपूर्ण विषयाच्या बाबतीत निष्क्रिय आणि दिशाहीन तसेच कर्तृत्वशून्य समाज नेते समाजात फक्त स्वतःच्या नावासाठी मोठेपणासाठी समाज नेतृत्वपदाचा खोटेपणाचा गवगवा करतात हे सिद्ध होईल. विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन अर्थात ओबीसी विचारधारे पासून दूर गेल्यास समाजात नेतेगिरी करणारे,नेतेगिरीसाठी उतावीळ झालेले,समाज नेतेगिरीचं बाशिंग गुडघ्याला बांधलेले,नेतेगिरीच्या थाटात आणि समाज नेतेगिरीच्या रुबाबात वावरणारे समाजातील सर्वच तथाकथित स्वयंघोषित समाज नेते याला प्रामुख्याने जबाबदार असतील हे मी विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाचा एक घटक म्हणून जबाबदारी पूर्वकच लिहीतो आणि तर्कशुद्ध मुद्देसूद संवैधानिक पध्दतीने खुलासा करण्यास सुद्धा तयार आहे.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणारे,स्वतःला समाजाचे कैवारी,समाजाचे तारणहार समजणारे,स्वतःला समाजाचे प्रमुख समजणारे,स्वतःला समाजाचे नेतृत्व समजणारे समाजाला योग्य वैचारिक मार्गावर घेऊन जाण्यासाठी,समाजाला योग्य दिशा देण्यासाठी संबंधित समाज नेतृत्व सर्वगुणसंपन्न गुणवत्तापूर्ण बुद्धिप्रामाण्यवादी बुद्धिवान शिवाय सामाजिक वैचारिक आणि नैतिक दृष्टीने दिशादर्शक भूमिकेत वावरणारे असणे गरजेचे असते.कारण संपूर्ण समाजाची सामाजिक सर्वांगीण विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक जबाबदारी नैतिक दृष्टीने समाजात नेतेगिरी करणाऱ्या नेत्यांच्याच खांद्यावर असते.समाजाची दिशाभूल होऊ नये यासाठी समाजातील सुशिक्षित,उच्चशिक्षित,बुद्धिवान समाज बांधवांनी,सर्वसामान्य समाज बांधवांनी जागरूक असणे गरजेचे अन्यथा समाजाची दिशाभूल झाल्या शिवाय राहणार नाही आणि समाजाच्या डोक्यावर स्वयंघोषित नेतेगिरीचं ओझं कायमस्वरूपी लादल्या जाईल.जर समाजात नेतेगिरी करणारे दिशाहीन असतील तर मात्र विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाच्या लोकसंख्याच्या बाबतीत समाजातील कोणत्याही सामाजिक संघटना आणि कोणत्याही स्वयंघोषित नेत्यांनी सुतार समाजाची मात्र दिशाभूल करु नये.विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची लोकसंख्या राज्यभरात ५० लाखापेक्षा अधिक असल्याचे सोशल मीडियावर वाचण्यात आले आहे.वास्तविक पाहता समाजाची लोकसंख्या राज्यात नेमकी किती लाख,किती कोटी आहे या बाबतीत शासकीय यंत्रणे मार्फत जनगणनेच्या संदर्भात कोणताही ठोस अहवाल कोणाकडेही नाही.कारण ओबीसींची जातीनिहाय जनगणना झालेली नाही.त्यामुळे विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाच्या लोकसंख्याच्या बाबतीत कोणत्याही सामाजिक संघटनेवर कोणत्याही स्वयंघोषित नेत्यांवर समाजाने अजिबात विश्वास ठेऊ नये.समाजाच्या लोकसंख्याच्या बाबतीत थातुरमातुर संभ्रम निर्माण करणारी आकडेवारी असून विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची निव्वळ दिशाभूल करणारी आहे.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात राज्यस्तरीय नामकरणाचा साज चढविलेल्या किमान २०० च्या जवळपास सामाजिक संघटना,संस्था विविध प्रकारचे विकास मंच कार्यरत आहेत.राज्यातील ३६ जिल्ह्यातील जवळजवळ ३६० तालुक्यात विश्वकर्मीय सुतार समाज विस्तारित आहे आणि राज्यभरात विविध राज्यस्तरीय सामाजिक संघटना कार्यरत आहेत.याच संघटनांच्या माध्यमातून समाजात विविध विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केले जातात असा संकेत समाजाला दिला जातो.यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक संघटनेचे जबाबदार अध्यक्ष आणि विविध पातळीवर पदाधिकारी वर्गाची निवड करण्यात येते.या मधूनच विश्वकर्मीय सुतार समाजात कर्तबगार,कर्तृत्ववान,कार्यसम्राट,समाज कैवारी,समाज तारणहार,समाज प्रमुख,समाज भूषण,समाजरत्न आणि असंख्य समाज नेतृत्व तर काही धडाकेबाज युवक नेतृत्व म्हणुन उदयास येत असतात.विशेषतः अशा पध्दतीने अत्यंत मानाच्या आणि सन्मानजनक उपाध्या नावासोबत जोडण्यासाठी विशिष्ट मूल्यांकन,मूल्यमापन पध्दत आणि कोणताही निश्चित मापदंड अस्तित्वात नाही.तरीही समाजात अशा पध्दतीने बिरुदावली जोडली जात असेल तर याला मात्र विश्वनिर्मात्याची विश्वकर्मीय चमत्कारिक देणगी म्हणावी लागेल.



विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज हा संवैधानिक दृष्टीने ओबीसी प्रवर्गातीलच एक मोठा ओबीसी घटक आहे याबाबतीत ज्यांना समाजात छातीठोकपणे जाहीर भाष्य करता येत नाही आणि ओबीसी संदर्भात समाजात राज्यभरात ठिकठिकाणी समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करता येत नाहीत अशा लोकांनी समाजात मोठ्या दिमाखात समाज नेतेगिरी करावी हि सुद्धा एक हास्यास्पद आणि आश्चर्यकारक बाब म्हणावी लागेल याचे एकमेव कारण म्हणजे समाजात समाज जागृतीचा अभाव जाणवतो. विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणारे समाज नेतेच जर दिशाहीन असतील तर मात्र विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल हे मी एक सर्वसामान्य ओबीसी सुतार समाज बांधव म्हणून जबाबदारी पूर्वकच लिहोतो. विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज हा संवैधानिक दृष्टीने ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक असतांना सुतार समाजात ओबीसी बद्दल समाज जागृती होतांना दिसत नाही.विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात ज्या गोष्टींची गरज आहे त्याकडे दुर्लक्ष केले जाते.ओबीसी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम हा विषय सामाजिक हितासाठी जिव्हाळ्याचा असायला पाहिजे परंतु, या विषयाकडे समाजातील तथाकथित स्वयंघोषित समाज नेते मात्र गांभीर्याने बघत नाहीत समाजाची हिच मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणे म्हणजे लहान मुलांचा खेळ नाही.समाजात नेतेगिरी करणारे सामाजिक वैचारिक आणि नैतिक जबाबदारी समजणारे तसेच बुद्धिप्रामाण्यवादी बुद्धिवान,समाजाचा परिपूर्ण अभ्यास अवगत असणारे सर्वगुणसंपन्न आणि विविध विषयांवर ज्ञानसंपन्न परिपक्व असणे गरजेचे असते.नेतृत्व करणारे,स्वतःला नेतृत्व समजणारे,उत्साही आणि नेतेगिरचं बाशिंग गुडघ्याला बांधून बसलेले,नेतेगिरी करण्यासाठी उतावीळ असलेले काही युवक नेते सामाजिक वैचारिक आणि नैतिक जबाबदारी समजणारे,समाजात विकासात्मक आणि विविध विषयांवर समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यासाठी बुद्धिवान,गुणवत्ताधारक असणे गरजेचे असते.कारण समाजात नेतेगिरी करणे म्हणजे समाजाची सामाजिक सर्वांगीण विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक जबाबदारी खांद्यावर येऊन पडलेली असते आणि समाजात नेतेगिरी करणे एखाद्या येड्यागबाळ्याचे,ऐऱ्यागैऱ्याचे काम नसते.

विश्वकर्मीय सुतार समाज हा स्वतःला सुशिक्षित उच्चवर्णीय समजतो.इथंच समाजात जागृतीचा मोठा अभाव जाणवतो, वास्तविक विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी म्हणजेच बहुजन समाज आहे.याचे भान सुद्धा नसावे याचे वाईट वाटते,सुतार समाजात आजही विश्वब्राह्मण म्हणजे उच्चवर्णीय समजतात आपण ओबीसी आहोत आणि ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक आहोत या बद्दल समाजात जबाबदारीने सांगण्यास कोणीही पुढाकार घेतांना दिसतं नाही त्यामुळे समाजात चुकीची माहिती पसरवली जाते आणि विश्वकर्मीय सुतार समाज ओबीसी समाजाचा एक मोठा ओबीसी घटक आहे.हे आजच्या तरुण पिढी पासून लपविले तर भविष्यात येणारी तरुण पिढी स्वतःला काय म्हणून घेणार याचा गांभीर्याने जबाबदारीने विचार कोणी करतांना दिसत नाही.

संपूर्ण विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज आपल्याच कब्जात आहे अशा थाटात वावरणाऱ्या तथाकथित स्वयंघोषित समाज नेत्यांनी राज्यभरातील खेडोपाडी,शहरात,कानाकोपऱ्यात,वाडीवस्तीमध्ये,गावागावात ओबीसी संदर्भात समाजात जागृती निर्माण करण्यासाठी आपल्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने समाज बांधवांना एकत्रित करून ज्ञानाचा ज्ञान भांडार खुला करावा आणि राज्यस्तरीय विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात ओबीसी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्याचा झंझावात निर्माण करावा.तसेच समाजातील असंख्य मान्यवर राज्यभरात विविध जिल्ह्यातील सामाजिक मंचावर समाजाचे जबाबदार कर्तबगार प्रतिनिधी म्हणून मानसन्मान प्राप्त करणारे,तसेच जबाबदार हजारो पदाधिकारी मित्रांनी,पत्रकार,साहित्यिक,विचारवंतानी सुद्धा ओबीसी संदर्भात समाज प्रबोधन करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे अशी माफक अपेक्षा व्यक्त केली तर चुकीचे ठरणार नाही.

ओबीसी सुतार समाजात अनेक जबाबदार आणि स्वतःला मान्यताप्राप्त प्रतिष्ठित समजणारे व्यक्ती आहेत अर्थातच राज्यस्तरीय विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात जेवढ्या सामाजिक संघटनांची निर्मिती करण्यात आलेली असेल त्या त्या संघटनांच्या माध्यमातून स्वतःला प्रतिष्ठित व्यक्ती म्हणूनच समाजात मिरवत असतील आणि राज्यस्तरीय विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजातील विविध जिल्ह्यातील विविध कार्यक्रमात सामाजिक मंचावर मोठ्या थाटात मानसन्मान प्राप्त करीत असतील त्यांची जबाबदारी आहे ती त्यांनी समाज जनजागृती वैचारिक प्रबोधन करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.परंतु,असे होतांना दिसत नाही याला समाजाचे भाग्य म्हणावे कि,दुर्भाग्य म्हणावे असा प्रश्न आजच्या तरुण पिढीला,सुशिक्षित,उच्चशिक्षित,बुद्धिवान समाज बांधवांना पडला पाहिजे.विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणारे एकप्रकारे समाजाचे पालकच असतात असं म्हटलं तर वावगे ठरणार नाही पण जिथे बापच जाग्यावर नाही तर पोरं काय करतील असं म्हणायची वेळ येईल.?

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणारे ओबीसी बद्दल समाजात समाज प्रबोधनात्मक दृष्टीने महत्व,गांभीर्य समजत नसलेले आणि दिशाहीन असलेले,ओबीसी,संविधान,जनगणना,आरक्षण,सत्ता,संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी बद्दल अपयशी मानसिकतेचे आणि विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करण्यासाठी लायक नसलेले,वैचारिक परिपक्वता नसलेले,सामाजिक विकासात्मक आणि विविध विषया संदर्भात समाज प्रबोधनात्मक नैतिक जबाबदारी आणि कर्तव्य समजत नसलेले विशेषतः सुशिक्षित,उच्चशिक्षित,बुद्धिप्रामाण्यवादी,बुद्धिवान असलेल्या विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात समाज नेतेगिरी करण्यासाठी लागणारी सर्वगुणसंपन्नता,गुणवत्तापूर्ण योग्यता,निकष,पात्रता आणि क्षमता सुध्दा नसतांना फक्त नेतेगिरीसाठीच निर्लज्जपणे,उतावीळपणे स्वतःच्या नावासाठी आणि मोठेपणासाठीच हापापलेले स्वयंघोषित समाज नेते असतील तर मात्र आवर्जून सांगावेसे वाटते कि,विश्वकर्मीय सुतार समाजातील नेत्यांनी ओबीसी संदर्भात कर्तबगारी दाखवावी अन्यथा ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल!

*******

जय संत भोजलिंग जय ओबीसी जय संविधान

प्रमोद सुर्यवंशी ८६०५५६९५२१ चिखली मातृतीर्थ बुलडाणा.

# अंधभक्तीचा उन्माद महायुतीच्या अंगलट!

शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांसह महाविकास आघाडीची सामाजिक कामगिरी उत्तम आहे म्हणून मतदारांनी तीस जागांवर त्यांना विजयी केले असे विश्लेषण व आकलन करणे म्हणजे महाराष्ट्र न समजणे होय. तसे असते तर मंत्री नारायण राणे, उदयनराजे भोसले आणि श्रीकांत शिंदे हे विजयी झालेच नसते. पण याचा अर्थ मतदारांना महायुती हवी होती असाही नाही. वस्तुस्थिती अशी आहे की शेतकऱ्यांना आश्वासनांखेरीज काहीच दिले गेले नाही, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाविषयी विश्वास जनमानसात निर्माण झाला नाही. बेरोजगारीचे वास्तव भेडसावत असतानाच नशेखोरीने महाराष्ट्र हवालदिल झाला आहे. महिलांच्या सुरक्षेचे प्रश्न गंभीर असतानाच सर्व प्रकारच्या गुन्हेगारीने हे राज्य त्रस्त झाले आहे. वर्तमानकाळातील सर्व प्रकारच्या प्रश्नांची मुळे कालच्या काँग्रेसच्या कारकिर्दीतच आहेत असे सांगून वेळ मारून नेण्याची आणि जबाबदारी झटकण्याची विचित्र सवय गेल्या १० वर्षांत सत्ताधारी भाजपसह त्यांच्या मित्रपक्षांना जडली आहे. या खोटारडेपणाचा महाराष्ट्राला खरा राग आला आहे.

लोकप्रतिनिधींच्या चुकांचेही समर्थन अत्यंत मग्रूरीने करणे, विरोधकांचा उन्मत्तपणे अपमान करणे, भांडवलदारांना सोयीच्या ठरतील अशा भूमिका घेत त्यासाठी कृती करणे, इतिहासाचा विपर्यास करणे या आणि अशा अनेक गोष्टींचा मतदारांना अक्षरशः वीट आला आणि त्यांनी महायुतीला नाकारण्याचा प्रयत्न केला. म्हणून महाविकास आघाडीला ३० जागांवर यश मिळवता आले, पण दुसरीकडे आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या सुशिक्षित अंधभक्तांनी अक्षरशः जिवाचे रान करत विजयासाठी प्रयत्न केले या निरपेक्ष प्रयत्नांमुळे भाजपाप्रणीत महायुतीला १७ जागांवर का होईना यश मिळवता आले हेही खरे आहे. निवडणूक प्रचारातही अंधभक्तीचा उन्माद दिसतच होता.

या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य असेही आहे की मागच्या निवडणुकीत जनतेने कौल दिलेल्या काही छोट्या राजकीय पक्षांना यावेळी त्यांच्या धोरणे व भूमिकांमध्ये समतोल साधला आला नाही आणि अस्मितांचे राजकारणही करता आले नाही. कोणाशी धड युती करता आली नाही आणि स्वबळावरही लढून विजयही मिळवता आला नाही. मागच्या निवडणुकीत ‘माना’चे स्थान मिळवणाऱ्या सत्तेवर प्रभाव टाकणाऱ्या काही पक्षांना आणि राजकीय संघटनांना यावेळी ‘नाममात्र’ स्थानही मिळाले नाही.

शिंदेंचे महत्त्व वाढले या निवडणुकीने देशाच्या राजकारणातील देवेंद्र फडणवीस यांचे महत्त्व जरा कमी केले आणि मंत्री नारायण राणे व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे महत्त्व वाढवले आहे. नारायण राणे यांच्या विजयाचे श्रेय महायुतीपेक्षा त्यांचे स्वतःचेच आहे. आता भाजपला नारायण राणे यांना टाळता येणार नाही. सात जागांवर विजय मिळवून एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या शिवसेनेशिवाय भाजपासह महायुतीला पर्याय नाही हे सिद्ध केले आहे. सात खासदारांच्या कामगिरीवर यापुढे शिंदे आणि त्यांचे सहकारी फडणवीस यांची राजकीय नाकेबंदी करू शकतात. कारण केंद्रीय सत्ता टिकवण्यासाठी सात खासदार हा आकडा मोठा आणि महत्त्वाचा आहे. परिणामी महायुतीत आता शिंदेंची शिवसेना हा मोठा भाऊ असे चित्र दिसले तर नवल नाही. दुसरीकडे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची या निवडणुकीतील कामगिरी एकाच जागेपुरती असल्याने त्यांची महायुतीतील राजकीय स्पेस मिळवण्याचे राजकारण शिंदेंची शिवसेना नक्कीच करेल. परिणामी आगामी काळात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राजकारण शिंदे यांच्या सेनेच्या कुबड्या घेतलेले असेल. काँग्रेसला लक्षणीय कौल महाराष्ट्रात आज तरी लोकसभा सदस्यांची संख्या पाहू जाता अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा मोठा पक्ष आहे. व्हॉट्सप विद्यापीठाच्या भरवशावर स्वयंघोषित विद्वान असणाऱ्या गल्लीबोळातील मरतुकड्या नेत्यांनी पंतप्रधान नेहरूंपासून अनेक महनीय व्यक्तींबाबत बेताल वक्तव्य करत काँग्रेसची कितीही अवहेलना केली आणि हा पक्ष नामशेष करण्याच्या प्रतिज्ञा करीत महात्मा गांधींवर कितीही टीका केली तरी आज महाराष्ट्राने काँग्रेसला लक्षणीय कौल दिला आहे. सांगलीत तर विशाल पाटील यांनी काँग्रेसच्या विचारसरणीशी निष्ठा ठेवून अपक्ष उमेदवार म्हणून दणदणीत विजय मिळवला आहे. चंद्रपुरात प्रतिभाताई धानोरकर यांनी भाजपला चारीमुंड्या चित केले आहे. १५ जागा लढवून १३ जागांवरचा काँग्रेसचा विजय विरोधकांना नामोहरम करणारा आहे. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने १० जागा लढवून आठ जागांवर दणदणीत विजय मिळवला आहे. महाविकास आघाडीने महायुतीला ३० जागांवर पराभवाचे पाणी पाजले आहे. तर काँग्रेसच्या एका अपक्ष शिलेदाराने महायुतीची चांगलीच दमछाक केली आहे. पक्षफोडीचे खापर शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या माथ्यावर फोडत बसणे यावेळी महायुतीला चांगलेच भोवले. पण अशा स्थितीतही केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना निवडून देत महाराष्ट्राने जातिधर्मांचे राजकारण न करता विकास आणि माणुसकीला प्राधान्यक्रम देणाऱ्या लोकप्रतिनिधीला जनतेचा पाठिंबा असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

अजित पवार, राज ठाकरे अपयशी दुसरीकडे प्रशासनावर पकड असलेला नेता अशी ख्याती असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ एका ठिकाणी यश मिळाले तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला सोबत घेऊन महायुतीने काय कमावले हे दोन्ही विषय बरेच दिवस चर्चेचे असणार आहेत. अजित पवार आणि राज ठाकरे या दोन्ही नेत्यांना या निवडणुकीत राजकीय सूर गवसला नाही. त्यांचे महत्त्व कमी झाल्याचे नागरिकच बोलून दाखवत आहेत. समाजमाध्यमांवर त्यांच्या पूर्वीच्या भाषणांच्या क्लिप फिरविण्यात येत असल्यामुळे सध्या तरी जनतेचे पुरेपूर मनोरंजन होत आहे. महायुतीच्या बेताल आणि बेफाम नेत्यांना वास्तवाचे भान देण्यासाठी ही दोन्ही उदाहरणे पुरेशी आहेत. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश करून राज्यसभेची खासदारकी मिळवत बेरजेचे राजकारण केले असले तरी त्यांना सोबत घेऊन महायुतीने आपली आदर्श वजाबाकी केली आहे. शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि काँग्रेसमधून आलेले आयाराम यांच्यामुळे अंधभक्तांचे चाणक्य असणारे तडफदार नेते मात्र स्वप्रतिमा आणि पक्षप्रतिमा दोन्ही गमावून बसले आहेत. पण राजकारणात पुढे काय होईल हे आज सांगता येत नाही. आजची प्रतिमा पाहून नागरिक मतदान करतात, उद्याचे राजकारण काय असेल ते सांगता येत नसते. अनेक वजाबाक्यांमधून बेरजेची समीकरणे सदसद्यःस्थितीत केवळ राजकारणातच निर्माण होणे शक्य आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने भावनेच्या राजकारणातून बाहेर पडून सेवा, संघटना, विज्ञान, संविधान, धर्मनिरपेक्षता यांना प्राधान्य देत मराठी भाषा व मराठी माणसांच्या आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या रक्षणासाठी नव्या जोमाने कामाला लागण्याची गरज आहे हे मुंबईतील मतदारांनी मतपेटीतून दाखवून दिले. महाराष्ट्रातील आंबेडकरी विचारांच्या मतदारांनी महाविकास आघाडीला मतदान करून संविधाननिष्ठा सिद्ध केली आहे, आगामी काळात संविधान,आरक्षण, विज्ञाननिष्ठा या मूल्यांशी महाविकास आघाडीने बांधिलकी कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आरक्षणाचे राजकारण, जुन्या पेन्शनसाठी कर्मचाऱ्यांनी केलेले आंदोलन, जुनी पेन्शन न देण्याचे धोरण आणि संघटनांची फोडाफोडी, नाठाळ कृतिशून्य वाचाळांना दिलेले महत्त्व आणि प्राधान्य यांमुळे महायुतीची वाटचाल वजाबाकीच्या दिशेने होत राहिली. परिणामी आज तरी महाराष्ट्रात सर्वांत मोठा पक्ष म्हणून काँग्रेसचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे.

# स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड

छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठ्या दूरदृष्टीने स्वराज्याच्या राजधानीसाठी रायगडाची निवड केली. यासंदर्भात बखरकार सभासद लिहितो, 'राजा खासा जाऊन पाहता गड बहुत चखोट, चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणे दिड गांव उंच. पर्जन्यकाळी कडियावरी गवत उगवत नाही आणि धोंडा तासीव एकच आहे. दौलताबादही पृथ्वीवर चखोट गड खरा परंतु तो उंचीने थोटका. दौलताबादचे दशगुणी गड उंच असे देखने बहुत संतुष्ट जाले आणि बोलिले तक्तास गड हाच करावा.'

शिवरांयानी राजधानी म्हणून किल्ले रायगड का निवडला, याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. स्वराज्यावर चालून आलेले आदिलशाही किंवा मोगली शत्रू आपला अफाट सेनासागर घेऊन प्रथम राजधानीत राजगडाच्या दिशेने नेहमी येत. कारण, स्वराज्याचा प्राण असलेले शिवाजी महाराज आपल्या कुटुंब कबिल्यासह राजगडावरच राहत असत. शाहिस्तेखानच्या स्वारीवेळी शिवरायांना याचा अनुभव आला होता.

२. राजगड किल्ला देशावर असल्यामुळे शत्रू सैन्यास आपले घोडदळ, पायदळ, अजस्र तोफखाना घेऊन राजगडाचा पायथा गाठणे शक्य असे. शिवाय या सैन्यास लागणारी रसद पुरविणेही शत्रू सैन्यास सहजसाध्य होत असे.

३. किल्ले राजगड भोवतालच्या मावळातील सर्वच वतनदारांचे स्वराज्यावर प्रेम होते असे नव्हते.

४. स्वराज्याच्या प्रारंभी अनेक आपत्तींना तोंड देत-देत स्वराज्य हळूहळू आकारास येत होते. त्यामुळे मुलकी कारभारासाठी अफाट पसार्याचा पण चिंचोळा माथा असलेला राजगड व्यवस्थित उपयोगात येत होता; पण पुढे जसजसे स्वराज्य वेगाने वाढू लागले तसतशी राजगडच्या माध्यावरील जागा प्रशासकीय कामासाठी अपुरी पडू लागली.

५) पश्चिम घाटातून एखादी पाचर मारल्यासारखी भासणारा रायगड सह्याद्रीच्या ऐन माथ्यावर नाही, तर तो सह्याद्रीपासून थोडा सुटावलेल्या बलदंड डोंगर माथ्यावर उभा आहे. त्याच्या तीन बाजूंनी अजस्र कडे व भयाण दर्यांमुळे त्याच्यावर चढणे शत्रूला अशक्य होते. त्याच्या चौथ्या बाजूवर भक्कम तटबंदी, मोक्याच्या ठिकाणी बुरूज व त्यात नाणे दरवाजा, चित दरवाजा, बलदंड असा महादरवाजा बांधून शिवरायांनी रायगड 'या सम हा' असा बेलाग बनवला होता.



६. समुद्रसपाटीपासून ८८२ मीटर उंचीवर असलेला रायगड मैदानी आक्रमकांच्या टप्प्याच्या पलीकडे सह्याद्रीच्या आडोशाला कोकणात एकाकी अशा डोंगरावर उभारलेला आहे. सह्याद्रीची १००० मीटर उंच भिंत ओलांडल्याशिवाय किल्ले रायगडास वेढा घालणे शत्रूला शक्य नव्हते. रायगडाच्या परिसरातील काळ नदीच्या पात्रामुळे या गडास नैसर्गिक खंदकाचे कवच लाभलेले होते.

७. रायगडाच्या माथ्यावरील सपाटीमुळे शिवरायांना राज्याभिषेकानंतर प्रशासकीय कामासाठी शेकडो इमारती बांधणे शक्य झाले. शिवरायांच्या राज्याभिषेकासाठी किल्ले रायगडावर इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झिंडेन आला होता. तो त्याच्या डायरीत लिहितो, '२१ मे १६७४ रोजी आम्ही गडावर आलो. गड फितुरीखेरीज अभेद्य असून वर राजमहाल, दरबार, प्रधानांची घरे मिळून सुमारे ३०० इमारती आहेत.'

८. रायगडावर राजधानी करण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे, गडावरील मुबलक पाणी. गडावर प्रचंड मोठे असे गंगासागर, हत्ती, कुशावर्त, कोळिंब असे तलाव होते. शिवकाळात गडावरील ही जलसंपत्ती निगुतीने जतन करत असत. आज आपण पाहतो की, गडपायथ्याच्या पाचाड गावात बर्याचदा पाण्याचा दुष्काळ असतो. पण, गडमाथ्यावर मात्र कधीही पाणी संपले असे होत नाही.

९. नवनिर्मित स्वराज्याच्या आर्थिक स्थैर्यासाठी पश्चिम किनार्यावरील व्यापारावर पकड ठेवणे गरजेचे होते. यासाठी शिवरायांनी आरमार उभारले.

बेटावरील जलदुर्ग, किनारीदुर्ग उभारले; पण या सागरावरील विस्तारास जंजिर्याच्या सिद्दीने वेळोवेळी खोडा घातला. शिवरायांनी १६५७ पासून १६७८ पर्यंत किमान सहा वेळा जंजिरा घेण्याच्या आटोकाट प्रयत्न केला; पण त्यात त्यांना यश आले नाही. शेवटी त्यांनी जंजिर्याच्या उरावर पद्मदुर्ग व जंजिर्याच्या समुद्र किनार्यावर लक्ष ठेवणारा सामराजगड बांधून सिद्दीच्या हालचालीस बर्यापैकी पायबंद घातला. रायगडावरून शिवरायांना सिद्दीवर लक्ष ठेवणे सोपे होते. तेथून ते वेळोवेळी हेरांकरवी सिद्दीची हालचाल टिपत होते. त्यांचे रायगडावरून सिद्दीकडे कसे डोळ्यात तेल घालून लक्ष होते, यासाठी एक उदाहरण देतो, ११ फेब्रुवारी १६७१ या दिवशी जंजिर्याच्या सिद्दी कासम अंधाराचा फायदा घेऊन सामराजगडाच्या पायथ्यासी आला. यावेळी गडावरील शिबंदी होळीच्या रंगात बेसावध होती. अचानक सिद्दीने हल्ला केला व या झटापटीत त्याने चाणाक्षपणे सामराजगडावरील दारू कोठार उडवून दिले. यात अनेक मराठ्यांचा मृत्यू झाला व मुरुडची किनारपट्टी स्फोटाच्या आवाजाने दणाणून गेली. यावेळी रायगडावर आपल्या राजमहालात झोपलेले शिवराय त्या आवाजाने झोपेतून दचकून जागे झाले. त्यांनी ताबडतोब रायगडावरून जासुदांना दंडा राजपुरीकडे रवाना केले. जासुदांनी मध्यरात्री घोडदौड करून रायगडावर खबर आणली, सामराजगड सिद्दीने घेतला. अशा प्रकारे शिवरायांना राजधानीच्या रायगडावरून कोकण किनारपट्टीवरील सिद्दीवर लक्ष ठेवणे शक्य झाले.

१०. स्वराज्याचे आरमार, बंदरे, घाट, परकीय मालाची आयात-निर्यात यावर नियंत्रण ठेवण्यास त्यावेळच्या स्वराज्याच्या केंद्रभागी कोकणात किल्ले रायगड होता. राजधानी रायगडापासून महाड येथील मध्यम बंदरावरून शिवरायांना सागरावर त्वरित हालचाल करणे शक्य होते. अशा अनेक कारणांमुळे शिवरायांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या शेकडो किल्ल्यांपैकी दुर्गदुर्गेश्वर रायगडास राजधानीचा मान दिला.

# परिपक्व आईपण

निर्मितीचा आनंद अनोखा असतो, असं म्हणतात. कुंभार मडकी बनवतो, सोनार दागिने घडवतो, शेतकरी राबराबून पीक फुलवतो. ही सारी निर्मितीचीच वेगवेगळी रूपं आहेत. दुसरीकडे आपण पाहतो की, आपल्यातलीच एखादी मंगल स्वयंपाककलेत जीव ओतून एखादा खमंग रुचकर पदार्थ बनवते आणि त्या निर्मितीतून सुखावते.कुणी मेघा कशिदा कामातून एखादी सुंदर वस्तू सजवते, त्या निर्मितीचा आनंद घेते. कुणी राजश्री परसबाग फुलवते आणि त्या निर्मितीतून समाधान मिळवते, तर आपल्यातलीच एखादी मनीषा कविता लिहून किंवा चित्र रेखाटून निर्मितीचं सुख अनुभवते. अशा निरनिराळ्या स्वरूपातल्या या लहान-मोठ्या निर्मितीमधून तर आपण अनोखे आनंदक्षण अनुभवत असतो, समृद्ध होत असतो; पण त्यातही कुठल्याही स्त्रीला नैसर्गिक निर्मितीचा आनंद देऊ करतं ते आईपण.'आपण आई होणार' या चाहुलीने कुठल्याही स्त्रीला जे सुखसमाधान अनुभवायला मिळतं, त्याची बात काही और असते. आई होण्याचा, एका वेगळ्याच विश्वात रमून जाण्याचा आनंद कुठल्याही स्त्रीसाठी शब्दांच्या पलीकडचा असतो.हा असतो नवा टप्पा आईच्या भूमिकेत शिरण्याचा, आईपण अनुभवण्याचा, आईपण वठवण्याचा, आईपण निभावण्याचा. आईपणाच्या या टप्प्यावर येण्याआधी खरं तर स्त्री वेगवेगळ्या भूमिका निगुतीने वठवत, निभावत आलेली असते. मुलगी, बहीण, मैत्रीण, बायको, सून या आणि अशा वेगवेगळ्या भूमिकांमध्ये वावरत आलेली असते. प्रत्येक भूमिकेची गरज समजून वागत आलेली असते. अशा प्रत्येक नात्यासोबत येणारी जबाबदारी जाणण्याचा आणि त्या बरहुकूम वागण्याचा प्रयत्न करत आलेली असते; पण आईपणाची भूमिका निभावणं यापेक्षा वेगळं असतं, अधिक गुंतागुंतीचं, अधिक जबाबदारीचं असतं.आईपणाच्या प्रक्रियेत आपण एका नव्या सजीवाला जन्म देत असतो; पण तेवढंच करून थांबणं अपेक्षित नसतं. मातीच्या गोळ्याला आकार देऊन त्यातून सुंदर भांडं घडवावं, तितक्या निगुतीने, संयमाने, सहनशीलतेने, सातत्याने हे नातं जपावं, निभवावं लागतं.आपल्या लेकराला सांभाळावं, घडवावं लागतं. अगदी आपलं लेकरू गर्भाशयातला एक लहानसा ठिपका असल्यापासून ते मोठं विचारी, विवेकी होईपर्यंत! तात्पुरती, थोड्याच दिवसांसाठीची ही गुंतवणूक नसते. ही गुंतवणूक असते अगदी आयुष्यभरासाठीची. आईपणातली जबाबदारी मोठी असते ती या अर्थाने. म्हणूनच आईपणाच्या चाहुलीने सुखावून जाताना या जबाबदारीचीही जाणीव ठेवणं अत्यावश्यक ठरतं.अर्थात, हेही तितकंच खरं की आईपणाची नुसती जाणीव ठेवून भागत नाही. सुज्ञपणाने, शहाणपणाने आईपण निभवता यावं म्हणून अनेक अर्थांनी आपल्याला तयार असावं लागतं. शारीरिक आणि मानसिक दृष्टीने परिपक्व आणि तंदुरुस्त असावं लागतं. आपलं शरीर आणि मन सशक्त सुदृढ नसेल, तर आपण एका सुदृढ जीवाला कशा काय जन्माला घालू शकणार, कशा काय सांभाळू शकणार, कशा काय घडवू शकणार? म्हणूनच तर आई होणार्या स्त्रीची तंदुरुस्ती सर्वात महत्त्वाची.

# मोठा काळ, छोटी गुंतवणूक

दीर्घ कालावधीसाठी, सातत्याने, ठरावीक अंतराने अगदी लहान रक्कम गुंतवून काही वर्षांनी मोठी रक्कम मिळवावी असं मनात असेल, तर एस. आय.पी. अर्थात सिस्टीमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅनचा विचार करता येतो. यात अगदी पाचशे रुपयांपासून आठ-दहा हजार रुपयांपर्यंत आपली जेवढी दरमहा गुंतवणूक करण्याची क्षमता आणि इच्छा असेल त्यानुसार रक्कम निश्चित करता येते. यात लगेच परतावा मिळत नाही; पण दीर्घकालीन फायदा मिळण्याची शक्यता मोठी असते.बहुतेक एसआयपी योजनांना लॉक-इन कालावधी नसतो. त्यामुळे पैसे दीर्घकाळ अडकून पडल्याची भावना निर्माण होत नाही व गरजेच्या वापरासाठी पैसे काढणं तुलनेने सुलभ असतं असं तज्ज्ञ सांगतात. आपलं बँक खातं आपल्या एसआयपी योजनेच्या खात्याशी जोडलेलं असावं लागतं.




एकदा नेमक्या 'एसआयपी'ची निवड केल्यावर म्युच्युअल फंड आपल्या खात्यातून रक्कम काढून घेतो आणि आपण निवडलेल्या प्लॅनमध्ये ठरावीक तारखेला जमा करतो. ही एक प्रकारची पद्धतशीर आणि शिस्तबद्ध गुंतवणूक ठरते. मुख्य म्हणजे यामुळे कमी जोखमीच्या बचतीची सवय लागण्याची शक्यता वाढते. आपण असं मानूया की, एखाद्या व्यक्तीकडे शेअर बाजारात गुंतवण्यासाठी लाख-दोन लाख रुपये आहेत. त्या व्यक्तीने ते पैसे एकत्र स्टॉकमध्ये ठेवले, तर अगदी दुसऱ्या दिवशीसुद्धा बाजाराची उलथापालथ कशी असेल हे त्या व्यक्तीला ठाऊक नसतं; पण तीच गुंतवणूक दीर्घकाळासाठी मासिक अंतराने विभागली गेली, तर गुंतवणुकीतला आणि परतव्याच्या संदर्भातला धोका कमी होतो. त्या दृष्टीने 'एसआयपी'त जोखीम कमी आहे, असं तज्ज्ञ सांगतात.

विशेष म्हणजे, काही एसआयपींमधल्या गुंतवणुकीसाठी कर सवलत मिळू शकते. कर सवलत मिळवण्याचा हेतू असेल, तर त्यानुसार सुरुवातीलाच तशा एसआयपीची निवड करणं श्रेयस्कर ठरतं. एसआयपीतल्या गुंतवणुकीच्या रकमेवर मिळणारा परतावा पुन्हा मूळ रकमेत गुंतवला जातो. त्यामुळे मुदलाची रक्कम वाढत राहते आणि त्यावर मिळणाऱ्या नफ्यातही वाढ होत राहते. त्यामुळे बहुतांश एसआयपीद्वारे कर सवलत मिळाली नाही, तरी एसआयपी गुंतवणूक फायद्याची मानली जाते.

# 'तेजी'चे वारे कायम, आज शेअर बाजारात काय घडलं?

लोकसभा निवडणूक निकालानंतर आज (६ जून) सलग दुसर्या दिवशी शेअर बाजारातील तेजी कायम राहिली. व्यवहार संपेपर्यंत निफ्टी २०१ अंकांनी वाढून २२,८२१ वर तर सेन्सेक्स ६९२ अंकांनी वाढून ७५,०७४ वर बंद झाला. निफ्टी बँक २३७ अंकांनी वाढून ४९,२९१ वर बंद झाला. आज मिड आणि स्मॉल कॅप निर्देशांकातही जोरदार खरेदी झाली, गेल्या दोन दिवसांत पिछाडीवर पडलेल्या सरकारी कंपन्यांनी आज पुन्हा खरेदीने पुनरागमन केल्याचे दिसले. आयटी आणि रिअल्टी क्षेत्रातील शेअर्संनी सर्वाधिक वाढ नोंदवली.

आज शेअर बाजारात काय घडलं?

× सलग दुसर्या दिवशी शेअर बाजारातील तेजी कायम
× मिड आणि स्मॉल कॅप निर्देशांकात सलग दुसऱ्या दिवशी खरेदी
× सरकारी कंपन्यांमध्ये जोरदार खरेदी

बुधवारी ७४,३८२ वर बंद झाल्यानंतर सेन्सेक्स आज सकाळी ९.४७ वाजता ४००.४२ अंकांच्या वाढीसह ७४,७४४.३०च्या पातळीवर व्यवहार करताना दिसला, तर निफ्टी १२२.३१ (०.५४%) अंकांनी वाढून २२,७४२.७४२च्या पातळीवर दिसून आला. सुरुवातीच्या व्यवहारात डॉलरच्या तुलनेत रुपया ३ पैशांच्या वाढीसह ८३.४१ रुपयांवर व्यवहार करत होता.मिडकॅप निर्देशांकात ८०० अंकांची वाढ झाली. चे शेअर्स ८% ची वाढ नोंदवत आहेत. याशिवाय ओएनजीसी, अदानी पोर्ट्स, बजाज फायनान्स, बजाज फिनसर्व्ह, बीपीसीएलमध्ये नफा नोंदवला जात आहे. एचयूएल, ब्रिटानियाचे शेअर्स तोट्यात होते. 'या' शेअर्संनी अनुभवली तेजी निफ्टीवर, एचसीएल टेक्नॉलॉजीज, श्रीराम फायनान्स, एसबीआय लाइफ इन्शुरन्स, टेक महिंद्रा आणि एसबीआय हे प्रमुख लाभधारक म्हणून हिरव्या रंगात बंद झाले. फार्मा आणि एफएमसीजी वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांक पीएसयू बँक, आयटी, रियल्टी ३-५ टक्क्यांनी वाढल्याने हिरव्या रंगात बंद झाले. तर बीएसई मिडकॅप इंडेक्स २ टक्क्यांनी आणि स्मॉलकॅप इंडेक्स ३ टक्क्यांनी वाढला. एनटीपीसी, एसबीआय आणि पॉवर ग्रिड सुरुवातीच्या व्यापारात सेन्सेक्समध्ये २.५ ते ५ टक्के वाढले. टेक महिंद्रा, टाटा स्टील, विप्रो आणि एचसीएल टेक देखील वाढीसह उघडले, तर आणि हे प्रमुख घसरणीत बंद झाले. एसबीआयच्या शेअर्समध्ये मोठी वाढ सरकारी कंपन्यांच्या शेअर्समधील वाढ कायम आहे. सरकारी बँक, रेल्वे, संरक्षण साहित्य निर्मिती शेअर्समध्ये १० टक्के वाढ झाली आहे. सरकारी क्षेत्रातील देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शेअर्समध्ये आज ५ टक्क्यांहून अधिक उसळी घेतली. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार स्थापनेचे संकेत मिळताच 'एसबीआय'च्या शेअर्सची खरेदी वाढली. आज ते निफ्टी ५० च्या टॉप गेनर्समध्ये होते.

# पावसाळी दिवसात शेवगा गुणकारी, जाणून घ्या फायदे...

लहानपणी एक गोष्ट वाचली होती. गरीब कुटुंब अनेक दिवस परसदरातील शेवगा खावून जगते आणि सुदृढ राहते असा त्याचा आशय होता. पूर्वीच्या काळी प्रत्येक घरात परसदारी अंगणात एखादी शेवग्याच्या शेंगाचे झाड असायचे. ज्याला भरपूर प्रमाणात शेंगा लागायच्या. शेवग्याच्या शेंगा आमटीत टाकून खाणे, फुलांची भाजी करणे आणि मृग नक्षत्राच्या पहिल्या दिवशी शेवग्याच्या पानांची भाजी खाणे, ही पद्धत पूर्वापार चालत आली आहे.

शेवगा हा आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी

शेवगा ही अतिशय गुणकारी ,सहज मिळणारी भाजी आहे. मृग नक्षत्राच्या पहिल्या दिवशी ही भाजी खाल्ली जाते कारण यामुळे पोटातील कृमी नष्ट होतात. पावसाळा बाधू नये , नव्या पाण्याचा त्रास होवू नये म्हणून सुरवातीला ही औषधी भाजी खाल्ली जाते. कृष्ण जन्मदिवशी देखील शेवग्याच्या पानांची भाजी आवर्जून खाल्ली जाते. काहीशा तुरट चवीची ही भाजी खायला लोक फारसे उत्सुक नसतात. आजकाल सर्वत्र जागरूकता वाढल्यामुळे शेवग्याची पाने, शेंगा, फुले लोकांनी खावीत म्हणून शेवगा महोत्सवाचे आयोजन देखील केले जाते.



जगभरात शेवग्याची मागणी भारतात सर्वच प्रदेशात शेवग्याचे झाड आढळते. त्याच्या अनेक प्रजाती देखील आहेत. जगातील सर्वात जास्त शेवगा उत्पादन करणारा देश म्हणून भारताला ओळखले जाते. आज-काल जगभर शेवग्याच्या पानांच्या पावडरला मोरिंगा पावडर म्हणून जबरदस्त मागणी आहे. भारतीय सुपरफुड म्हणून शेवग्याच्या पानांच्या पावडरला विशेष स्थान मिळाले आहे.

शेवगा देते दुधापेक्षा दहापट जास्त कॅल्शिअम शेवग्याचे अख्खे झाडच औषधी आहे. शेवग्याच्या गोल छोट्या पानांची घरोघरी भाजी केली जाते. डाळ, कांदा घालून केलेली ही भाजी भाकरी सोबत खावी अशी आपली पद्धत आहे. शेवग्याच्या पानांमध्ये दुधाच्या दसपट कॅल्शियम आहे. कॅल्शियम चा इतका मुबलक आणि स्वस्त स्त्रोत दुसरा कोणताही नाही. त्यामुळे सर्व स्त्रियांनी शेवग्याच्या पानांची पावडर रोज एक चमचा पाण्यातून घेतल्यास त्यांची हाडे बळकट होण्यास मदत होते. वाढत्या वयातल्या मुलांना ही शेवग्याच्या पानांची भाजी, शेंगा खाऊ घातल्यास त्यांची उंची भरभर वाढते. असं म्हणतात की शेवग्याच्या शेंगा खाल्ल्यामुळे तुमचे मूल शेवग्याच्या शेंगेसारखेच काटक आणि उंच होईल.

रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी शेवगा लाभदायक शेवग्यामध्ये विटामिन सी देखील विपुल प्रमाणात आहे. त्यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढते. पालक भाजीच्या पाचपट लोह यामध्ये आहे. याचबरोबर विटामिन ए , विटामिन बी२, बी३ विपुल प्रमाणात आहे. मॅग्नेशियम, झिंक हे देखील भरपूर प्रमाणात आहे. लोह चांगल्या प्रमाणात आहे. त्यामुळे शेवग्याची भाजी खाणे म्हणजे भरपूर प्रमाणात पोषणमूल्य मिळवण्यासारखे आहे. यात प्रभावी अँटी ऑक्सिडन्ट्स असल्यामुळे तरुण राहायला मदत होते. यासोबतच कर्क रोगांपासून संरक्षण मिळते.

भारतासारख्या देशामध्ये प्रत्येक गरीब व्यक्तीला देखील सहजासहजी उपलब्ध होणारी भाजी म्हणजे शेवग्याची भाजी होय. कुपोषित मुलांसाठी तर ते वरदान आहे. शेवग्याच्या पानांचा काढा, फुलांची पावडर औषधी आहे. यात जंतुनाशक, बुरशीनाशक गुण असतात. त्यामुळे त्वचा निरोगी ठेवायला ही मदत करते. शेवग्याच्या फुलांमध्ये देखील प्रभावी अँटिऑक्सिडंट आहेत. त्यामुळे फुले वाळवून त्याची पावडर देखील खाल्ली जाते. सौंदर्य वाढीसाठी उपयोगी पडते. शेवग्यामध्ये रक्तदाब नियंत्रित करण्याची विशेषता आहे. यामुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहते. बद्धकोष्ठता दूर व्हायला मदत होते.

मुतखडा पाडण्यासाठी शेवगा गुणकारी शेवगा नियमित खाल्ल्याने मूतखडा पडण्यास मदत होते. भरपूर प्रमाणात लघवी होते. वजन कमी करण्यासाठी शेवगा मदत करतो. तसेच शेवगा खाल्ल्यामुळे केस गळण्याचे थांबते. पावसाळ्यात होणारे सर्दी पडसे, ताप, खोकला यासारखे आजार दूर ठेवायचे असल्यास अधून मधून शेवग्याची पानांची भाजी, आमटीत, कढीत, पिठल्यात शेंगा टाकून खाव्यात. पराठे, थालीपीठ, भजी, वड्या ,सूप असे पदार्थ खावेत. आपल्या भारतीय आहार परंपरेतील एक महत्वाची परंपरा पुनरुज्जीवित झाली पाहिजे.

# करिअर खाद्यपदार्थ विज्ञान-तंत्रज्ञान; जाणून घ्या याविषयी

आपल्या सगळ्या जीवन प्रक्रियांची मूलभूत गरज म्हणजे, अन्न. म्हणूनच खाद्यपदार्थ शास्त्र आणि तंत्र हे केवळ आपल्या कुटुंबाला जबाबदारीने पोषक व समतोल आहार देणाऱ्या गृहिणीसाठीच नव्हे, तर हॉटेल्स, हॉस्पिटल, कॅन्टीन इत्यादी अन्नपुरवठा करणाऱ्या मोठ्या संस्थांसाठीही महत्त्वाचं आहे. खाद्यपदार्थ तंत्रज्ञाचं काम प्रामुख्याने तांत्रिक व शास्त्रशुद्ध असतं. हॉटेल्स, हॉस्पिटल्स, अन्नपुरवठा करणाऱ्या संस्था, खाद्यपदार्थ उद्योग इत्यादी ठिकाणी हे तज्ज्ञ काम करतात. खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणं, त्याची चव बघणं, ताज्या आणि टिकाऊ अन्नपदार्थांच्या भेसळीसंदर्भात तपासणी करणं या मूलभूत कामांसोबतच अन्नपदार्थ कोणत्या तापमानाला थंड करावा इत्यादी तांत्रिक गोष्टींबद्दलही सल्ला देतात.

फूड इंडस्ट्री ज्या पद्धतीने आकार घेत चालली आहे ते पाहता त्यानुसार खाद्यपदार्थ विज्ञान-तंत्रज्ञानाशी संबंधित अनेक छोटे-मोठे अभ्यासक्रम आता उपलब्ध झाले आहेत. छोट्या कालावधीचे सर्टिफिकेट व डिप्लोमा अभ्यासक्रम या अंतर्गत उपलब्ध आहेत. अन्नपुरवठा करणाऱ्या लहान संस्था, खाद्यपदार्थ प्रक्रिया करणाऱ्या संस्था इत्यादींमध्ये नोकरी मिळवण्यासाठी असे अभ्यासक्रम उपयुक्त असतात. खाद्यपदार्थांच्या संदर्भातलं संशोधन व प्रशिक्षण करणं, तसंच स्वतःचा व्यवसाय सुरू करणं यासाठी पदवी आणि संशोधनातील गुणवत्ता उपयुक्त ठरते. खाद्यपदार्थ तयार करण्याच्या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असल्यामुळे संशोधनाच्या क्षेत्रात खाद्यपदार्थ तंत्रज्ञांनाला खासगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांत अलीकडच्या काळात मागणी वाढत आहे. त्यामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञानाची सांगड घालत अन्नपदार्थांच्या रुचकर क्षेत्राची आवड जोपासायची असेल, तर खाद्यपदार्थ विज्ञान-तंत्रज्ञानाच्या विद्याशाखेचा विचार हटके ठरेल.



# लामजना निवासी शाळा येथे प्रवेश प्रक्रिया सुरु

लातूर:- महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची निवासी शाळा अनु.जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा लामजना ता. औसा जि.लातूर येथे इयत्ता ६ वी ते इयत्ता १० वी सेमी इंग्रजी माध्यमाची जून २०२३ पासून सुरु झाली असून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. अनुसिचीत जाती व नवबौद्धांच्या मुला/मुलींकरिता प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक आशा ३५३ शासकीय निवासी शाळा सुरु करणे बाबत दि. १ जून २००६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्णय घेतलेला आहे. राज्यात आजतागायत ९० पेक्षा जास्त निवासी शाळा सुरु असून या योजने अंतर्गत लातूर जिल्ह्यात ५ निवासी शाळा सुरु आहेत . लामजना येथे सामाजिक न्याय विभागाने सेमी इंग्रजी माध्यमाची भव्य व दिव्य सर्व सोयीयुक्त आपल्या शैक्षणिक योजनांचा विस्तार करत जिल्हावासियांसाठी ६ वी शाळा औसा तालुक्यातील लामजना येथे दि. १५ जून २०२३ पासून सुरु झालेली आहे. तरी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ प्रवेश प्रक्रिया करण्याकरिता सामाजिक न्याय विभागाचे कर्मचारी गावोगावी सर्वे, पालक भेटी, विद्यार्थी शोध मोहीम इ. राबवत आहेत. या शाळेत इयता ६ वी ते इ १० वी सेमी इंग्रजी माध्यमाच्या प्रत्येकी वर्गासाठी फक्त मुलाकरिता ४० जागेसाठी प्रवेश प्रक्रिया पार पाडत आहे. या करिता सामाजिक आरक्षणही पुढील प्रमाणे ठेवण्यात आलेले आहे. अनुसूचित जाती ८०% अनुसूचित जमाती १०% विमुक्त जाती व जमाती ५% दिव्यांग प्रवर्ग ३% व विशेष मागास प्रवर्ग २%.

राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या अनु.जाती व नवबौद्ध मुला/मुलींची शासकीय निवासी शाळेंचा इयत्ता १० वी वर्गाचा १००% निकालाची परंपरा आहे. सर्व शाळा आय.एस. ओ. मानांकन प्राप्त असून सन २०१६-१७ च्या मानवसंसाधन विकास मंत्रालय नवी दिल्ली यांचा स्वच्छ विद्यालय पुरस्कार तसेच जलसंवर्धन नदी विकास व गंगा संरक्षण मंत्रालय नवी दिल्ली यांचा सन २०१७-२०१८ चा राष्ट्रीय जल पारितोषक पुरस्कार विभागातील अनेक शाळेने पटकावलेला आहे. या शाळेत महाराष्ट्र शासन व कला संचालनालय मुंबई मार्फत घेण्यात येणाऱ्या इलेमेंटरी व इंटरमीजीट परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा इ.ची तयारी करून घेण्यात येते. तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांना १ वेळा नाश्ता २ वेळा पोटभर रुचकर जेवण, अंघोळीसाठी गरम पाणी, पिण्यासाठी आर.ओ.चे पाणी, २ गणवेश व आवश्यक शैक्षणिक व इतर साहित्य विनामुल्य देण्यात येते. गत काही वर्षात शाळेने महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात अल्पविधीत आपले नाव मिळविले आहे. १००० पेक्षा जास्त संदर्भ पुस्तकांचे ग्रंथालय, ई-लायब्ररी, अत्याधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल वर्ग खोल्या, प्रोजेक्टरचा आद्यापनात प्रभावी वापर, संगणककक्ष, २४ तास सुरक्षा रक्षक, अनुभवी व तज्ञ शिक्षक येथे उपलब्ध आहेत. लामजना येथील शाळेत राज्य स्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार व सामाजिक न्याय विभागाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त यांची नेमणूक केलेली आहे.तरी इच्छुकांनी या शाळेत प्रवेशासाठी दिनांक १४ जून २०२४ पर्यंत शाळेचे मुख्याध्यापक - श्री. डी. एस. मुखम - ९४०४२ ७२७७४ सहाय्यक शिक्षक/ शिक्षिका- श्री ए.वाय. हौसलमल- ८६६८३०६५४७, श्रीमती एस. एस सुर्यवंशी ९७६७६३५०८२ , श्रीमती एस.एस.पांचाळ : ७७५८० ९६३७७ श्री.एस.व्ही.कांबळे ८६६८७६४५९० व श्री डी. यांचे कडे नोंदणी करून घ्यावे तसेच दि. १५ जून २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता निवासी शाळा लामजना येथे प्रत्येक्ष प्रवेशासाठी विद्यार्थ्यासह पालकांनी उपस्थित रहावे असे आव्हान शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

## मौ.वानेवाडी येथील ग्रामसेवक,व सरपंच,यांच्यावर भ्रष्टाचार केल्याप्रकरणी तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करा! रि पा इं (खरात) ची मागणी

धाराशिव प्रतिनिधी:-वानेवाडी ग्रामपंचायत अंतर्गत गावात करण्यात आलेल्या विकास कामांमध्ये लाखो रुपयाचा घोटाळा करण्यात आला आहे. चौदाव्या,पंधराव्या वित्त आयोगातून, करण्यात आलेली विकास कामे ही थातूर,मातूर व अतिशय निकृष्ट दर्जाची करून या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक,गिरी,व सरपंच यांनी दोघांच्या संगनमताने स्वतःचे खिसे गरम करून गावाची व शासनाची फसवणूक केली. म्हणून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून तात्काळ कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) पक्षाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत यांनी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे याबाबत सविस्तर माहिती अशी की,शासन नियमानुसार वित्त आयोगातून कामे करत असताना पंधरा ते वीस% रक्कम दलित वस्तीमध्ये खर्च करणे बंधनकारक आहे असे असताना दलित वस्तीमध्ये एकही काम केले नाही. ग्रामपंचायत कर वसुलीमध्ये,बनावट खर्चाची वाउचर सादर करून पैसे उचलले,घरकुल बांधकामात अनिमता घराचे बांधकाम न करता खोटी बिले सादर करून पैसे उचलले आहेत,ज्या जागेची आठ अ.दिली आहे त्या जागेत घराचे बांधकाम न करणे,गावाच्या विकासासाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधीतून विकास कामे न करता पैसे उचलणे,अशाप्रकारे वाणेवाडी येथील ग्रामपंचायतचे सरपंच, व ग्रामसेवक यांनी कोणालाही विश्वासात न घेता बोगस कामे करून स्वतःच्या फायद्यासाठी शासनाची फसवणूक करून लाखो रुपये गैर मार्गाने उचलून स्वतःचा आर्थिक फायदा केला आहे. तसेच रोजगार हमी योजनेच्या कामांमध्ये मजुराचे बनावट हजेरी मस्तर तयार करून प्रत्यक्ष मजूर कामावर नसताना पैसे उचलले रो ह.यो च्या कामावर ज्येष्ठ नागरिकांना घेता येत नसताना त्यांचेही बोगस बनावट हजेरी रजिस्टर तयार केले.

## महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते गजानन भातलवंडे पोलीस उपाधीक्षक यांना राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान



लातूर :- गजानन लक्ष्मीकांतराव भातलवंडे, पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय, लातूर यांना गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल रमेश बैस यांचे शुभहस्ते दिनांक ६ जून रोजी दरबार हॉल राजभवन मुंबई येथे शानदार सोहळ्यात राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान करण्यात आले.

गजानन भातलवंडे हे सन १९९३ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक या पदावर नेमणूक झाल्यानंतर त्यांच्या सेवा कालावधीत भंडारा, गोंदिया या नक्षलग्रस्त भागासोबतच नांदेड, बीड, परभणी, लातूर या ठिकाणी सेवा बजविले आहे. गजानन भातलवंडे यांनी यापूर्वी लातूर पोलीस दलात स्थानिक गुन्हे शाखेत पोलीस निरीक्षक म्हणून उत्तम कामगिरी बजावली आहे.

गजानन भातलवंडे यांना पोलीस दलातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल यापूर्वी विशेष सेवा पदक, आंतरिक सुरक्षा पदक तसेच माननीय पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह त्यांना प्रदान करण्यात आले आहे. आजपर्यंतच्या सेवा कालावधीत गजानन भातलवंडे यांना ६५० बक्षिसे आणि ५१ प्रशंसापत्र मिळालेली आहेत.

गजानन भातलवंडे यांना गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल मानाचे राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाल्याबद्दल सोमय मुंडे, पोलीस अधीक्षक लातूर, अजय देवरे, अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांनी तसेच लातूर पोलीस दलातर्फे व अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई, जिल्हा शाखा लातूर, नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

## पुन्हा एकदा लातूर पोलिसांची गुटख्याच्या कारखान्यावर धाड ४४ लाखापेक्षा जास्त किमतीचा मुद्देमाल जप्त





लातूर :- लातूर पोलिसांकडून पुन्हा एकदा एमआयडीसी परिसरात गुटखा बनविणाऱ्या कारखान्यावर धाड टाकून ४४ लाखापेक्षा जास्त मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. मागील आठवड्यात अतिरिक्त एमआयडीसी परिसरात लातूर पोलिसांकडून गुटखा बनविणाऱ्या कारखान्यावर धाड टाकून ३ कोटी रुपया पेक्षा जास्त किमतीचा गुटखा व गुटखा बनविण्याचे साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. एमआयडीसी पोलिसांना गोपनीय मिळालेल्या माहितीच्या आधारे लातूर अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील राहुल कोल्ड्रिंक्स, प्लॉट नंबर १४८ या गोडाऊन वर दिनांक ०७ जून २०२४ रोजी छापा टाकला असता शासन प्रतिबंधित गुटखा व गुटखा तयार करण्याचे साहित्य असे ४४,२२,६७८/- (४४लाख २२ हजार ७६८ रुपये) रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

सदर प्रकरणी यातील आरोपी नामे १) विजय केंद्रे, २) जयपाल जाधव, ३) बाळासाहेब वाघमारे, ४) मल्हारी मजगे आणि ५) अर्जुन केदार यांचे विरुद्ध एमआयडीसी पोलीस स्टेशन लातूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे.

सदर प्रकरणी श्री सोमय मुंडे, पोलीस अधीक्षक, लातूर, श्री अजय देवरे, अपर पोलीस अधीक्षक, लातूर, श्री भागवत फुंदे, उपविभागीय पोलिस अधिकारी, लातूर शहर यांचे मार्गदर्शनात एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री एस डी नरवाडे, पोलीस उपनिरीक्षक श्री कराड, सहाय्यक फौजदार श्री जगताप, पोलीस हवालदार पिस्तुलकर, पोलीस हवालदार देशमुख, पोलीस नाईक भोसले, गाडे पोलीस अंमलदार दळवे व चालक पोलीस अंमलदार जाधव यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.


## वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा २३ जुन रोजी सत्कार सोहळा गुणवंत पात्र विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी - जगद्विवेक प्रतिष्ठान

**या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष होणार सत्कार**

९५ टक्के पेक्षा अधिक गुण घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान या सोहळ्यामध्ये करण्यात येणार आहे. जे विद्यार्थी इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेत ९५ टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन विशेष प्राविण्यात उत्तीर्ण झालेले आहेत.अशा सर्वधर्मीय गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात येईल. अशा गुणवंत विद्यार्थ्यांनी ९८ २२ ६२ ८५ २१ या व्हाट्सअप नंबर वर मार्क्स मेमो, आपला मोबाईल नंबर, संपूर्ण पत्ता, पासपोर्ट फोटो पाठवून १५ जून पर्यंत नोंदणी करावी. असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष वैभव स्वामी यांनी केले आहे.

बीड / प्रतिनिधी :- वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता १० वी आणि १२ वी वर्गातील विद्यार्थ्यांचा गुरुवर्य तसेच अधिकारी, लोकप्रतिनिधी, पत्रकार यांच्या शुभहस्ते रोख रकमेसह सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र असलेल्या गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पाल्यांनी नोंदणी करून पुरस्कार स्वीकारण्यासाठी आपल्या संपूर्ण परिवारासह उपस्थित रहावे असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. बीड येथील स.मा. गर्गे भवन येथील वाचनालय सभागृहात रविवार दिनांक २३ जून रोजी सकाळी ११ वाजता वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता १० वी आणि १२ वी वर्गामध्ये विशेष प्राविण्यासह प्राप्त झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र असलेल्या इयत्ता १० वी आणि १२ वीत किमान ७५ टक्के गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ९४ २२ ७४ ४६ ०५ प्रतिष्ठानचे सचिव विकास स्वामी यांच्या व्हाट्सअप नंबर वर आपला मार्क्स मेमो, स्वतःचा पासपोर्ट फोटो, संपर्क नंबर, संपूर्ण पत्तासह १५ जून पर्यंत नोंदणी करावी. सदरील पुरस्कार हा गुरुवर्य यांच्या पावन उपस्थिती मध्ये तसेच प्रशासनातील महत्त्वपूर्ण अधिकारी, त्याचबरोबर आमदार किंवा खासदार किंवा लोकप्रतिनिधी तसेच माध्यमातील प्रतिष्ठित पत्रकार यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे. नोंदणी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यां मधून जे प्रथम, द्वितीय तृतीय आणि उत्तेजनार्थ असे मिळालेल्या मार्क्स टक्केवारी वरून क्रमांक काढले जातील. या विद्यार्थ्यांना रोख बक्षीसासह सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात येईल. त्याचबरोबर ७५ टक्के पेक्षा जास्त असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दिली जाईल. जगद्विवेक प्रतिष्ठानच्या संस्थापिका स्वर्गीय जगदेवी विवेक स्वामी यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी वीरशैव लिंगायत समाजातील विद्यार्थ्यांना गौरांकित करण्यात येणार आहे. यासाठी पात्र विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी वरील व्हाट्सअप नंबर वर संपर्क करून नोंदणी करावी असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने सचिव विकास स्वामी, अध्यक्ष वैभव स्वामी, विश्वस्त वैशाली अशोक पडोळे, रूपाली श्रीकांत स्वामी यासह समस्त स्वामी परिवारातील येळंबकर सदस्य यांनी केले आहे.

## कोट्यावाधिं बंधाऱ्याचे पाणी मुरेना पाणी जिरेना, जलसंधारण कामाच्या बोगसगिरी



किनवट / शेख शौकत :- किनवट माहूर तालुक्यात सुरू बंधारा बांधकामाकडे ग्रामस्थांचे फारसे लक्ष नाही.. याच तांत्रीक बाबीचा लाभ उठवत संबंधित ठेकेदार आपली दुहेरी असलेल्या तांदळा येथील जलसंधारणाच्या होत असलेल्या बंधा-यात प्रचंड बोगसगीरी होत असून या कामांसाठी शासनाने कोट्यावधींचा निधी उपलब्ध करून देवून कामांस मंजूरी दिल्यानंतरही ठेकेदाराकडून मोठ्या प्रमाणात पैसा वाचवण्यासाठी चक्क नाल्याच्या रेतीनेच कामे होत असल्याने एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी देवूनही हा बंधारा अत्यंत निकृष्ट दर्जाचा होत असल्याची ओरड गावक-यांतून होत आहे माहूर तालुक्यातील मौजे तांदळा येथे जलसंधारणाच्या कामातून येथील एका नाल्यावर बंधारा बांधण्याचे काम सुरू असून या बंधा-यासाठी किमान ८५ लक्ष ते १ कोटी रूपयाचा निधी शासनाने मंजूर केल्याची खात्रीलायक माहीती आहे.. गावापासून तब्बल एक ते दिड किलोमीटर अंतरावर सुरू असलेल्या या भुमिका बजावताना दिसत असून एकीकडे नाल्याच्या रेतीचा बेसुमार उपसा करून त्याच मातीमिश्रीत रेतीने सदर बंदा-याचे काम झपाट्याने करून मोठी रसद गिळंकृत करण्याचा मानस बाळगून आहे दरम्यान या ठिकाणी नाल्यातील उपसा केलेली तब्बल शंभर ब्रास रेतीचे ठिगारेच ठिगारे संबंधित ठेकेदाराने साचवले असून या रेतीचा उपयोग या कामानंतर नदीची रेती म्हणून खाजगीत विकण्याचा तर इरादा नाही ना..? असा प्रश्न प्रत्यक्षदर्शीना पडला आहे तर एवढ्या मोठ्या प्रमाणात नाल्याच्या रेतीचा उपसा होत असूनही महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी व तलाठी हे मुग गिळून गप्प का..? असाही सवाल सर्व सामनीन्यांना पडला असून हस्तक्षेपाने बंधा-याच्या नावाखाली होत असलेली बोगसगीरी जाणिवपुर्वक दाबल्या जात असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने लक्ष देवून बंधा-याचे बोगस काम थांबवून दर्जेदार काम करण्यास संबंधित ठेकेदारास बाध्य करावे..व नाल्याच्या रेतीचे उत्खनन करण्यास मनाई असतानाही शेकडो ब्रास नाल्याची रेती खोदल्याप्रकरणी तहसीलदार माहूर यांनी संबंधित ठेकेदारावर तात्काळ गुन्हे दाखल करावेत अशी माफक अपेक्षा निसर्गप्रेमी बाळगून आहेत.

## शहर स्वच्छतेसाठी रात्री उशिरापर्यंत राबले मनपा अधिकारी व कर्मचारी !

लातूर/ प्रतिनिधी :- गुरुवारी (दि.६ )सायंकाळी शहरात झालेल्या जोरदार पावसानंतर विविध भागात तुंबलेल्या पाण्याला रस्ता करून देत शहर स्वच्छतेसाठी मनपाचे अधिकारी व कर्मचारी रात्री उशिरापर्यंत राबले. शहरात ज्या ठिकाणी पाणी साठले होते तो संपूर्ण परिसर स्वच्छ केल्यानंतरच हे अधिकारी व कर्मचारी आपापल्या घरी पोहोचले.

गुरुवारी सायंकाळी शहरात जोरदार पाऊस झाला.यामुळे शहरातील कांही सखल भागात पावसाचे पाणी साठले. अचानक झालेल्या मोठ्या पावसामुळे पाण्याचा लवकर निचरा झाला नाही. शहरातील सरस्वती कॉलनी,सौभाग्य नगर, बरकत नगर,चाणक्य सोसायटी,उस्मानपुरा,नाना-नानी पार्क,नवविकसित एसटी हाऊसिंग सोसायटी, केशवनगर, इस्लामपुरा,डी मार्ट,मंत्री नगर,देशमुख नगर, रेणापूर नाका,कन्हेरी,जुने जिल्हाधिकारी कार्यालय, बांधकाम भवन या भागातील नाले तुंबले होते. त्यामुळे सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साठले होते.

ही बाब लक्षात आल्यानंतर मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी या






परिसरातची तात्काळ स्वच्छता करून साठलेल्या पाण्याचा निचरा व्हावा यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मनपा अतिरिक्त आयुक्त शुभम क्यातमवार, सहाय्यक आयुक्त मंजुषा गुरमे,स्वच्छता विभाग प्रमुख, रमाकांत पिडगे,अग्निशमन अधिकारी सुभाष कदम, क्षेत्रीय अधिकारी,स्वच्छता निरीक्षक यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून कामकाजाला गती दिली.कर्मचाऱ्यांनी या परिसरातील नाल्यांमध्ये अडकलेला कचरा काढून पाण्याला वाट मोकळी करून दिली.अनेक ठिकाणी वाऱ्यामुळे झाडे पडली होती.ती देखील तात्काळ उचलण्यात आली.नाल्यांमधून काढलेला कचरा लगेचच उचलून घेण्यात आला. यामुळे साठलेल्या पाण्याचा लगोलग निचरा झाला.

पावसाळ्याच्या काळात शहरात कुठेही पाणी साठू नये आणि नागरिकांना त्रास होऊ नये याची खबरदारी मनपाकडून घेतली जात आहे.मनपाने शहरातील लहानमोठ्या नाल्यांची स्वच्छताही केली आहे.गुरुवारी झालेल्या पावसानंतरही मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रात्री उशिरापर्यंत काम केले.यामुळे त्या परिसरातील नागरिकांनी मनपाचे आभार मानले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE